
# मुलांची भाषा आणि शिक्षक



लेखक
कृष्णकुमार

मराठी रूपांतर
वर्षा सहस्रबुद्धे

'The Child's language and the teacher' चे मराठी रूपांतर
**मुलांची भाषा आणि शिक्षक**

**लेखक** : कृष्णकुमार
**मराठी रूपांतर** : वर्षा सहस्रबुद्धे

**© वर्षा सहस्रबुद्धे**

**मूलगामी प्रकाशन**
१२९४, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

**मुखपृष्ठ व आतील चित्रे** : माधुरी पुरंदरे

**मुद्रण स्थळ** : स्टेप इन सर्व्हिसेस, पुणे.

**किंमत** : रु. ८०/-

'पालकनीती' या नियतकालिकाच्या २००२ व २००३ च्या अंकामध्ये या पुस्तकाचे मराठी रूपांतर प्रथम प्रसिद्ध झाले.

## मराठी रूपांतराच्या निमित्ताने

कृष्णकुमारांचे 'मुलांची भाषा आणि शिक्षक' मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या वाटेवर दुवा म्हणून काम करता आले याचा आनंद वाटतो.

मराठी भाषेच्या संदर्भात, मुलांच्या भाषा-शिक्षणाच्या संदर्भात काम करण्याची आंतरिक गरज दहा-बारा वर्षांपूर्वी जाणवली. मुले वाचती होताना, लिहिती होताना नेमके काय काय घडते याविषयी मराठीत काही साहित्य उपलब्ध आहे का याचा तेव्हा शोध घेतला. अशा साहित्याचा अभाव जाणवला.

अन्य भाषांमधली जी पुस्तके तेव्हा वाचनात आली, त्यापैकी कृष्णकुमारांचे The Child's language and the teacher हे एक महत्त्वाचे पुस्तक. ते मराठी भाषक मुलांसाठी लिहिलेले नसले तरीही भारतीय संदर्भात लिहिलेले असल्याने त्याचा विशेष ठसा माझ्या विचारांवर उमटला. भाषेकडे आणि बालपणातील भाषाविकासाकडे पाहण्याला एक दिशा त्यातून मिळाली.

सुमारे दोन वर्षांपूर्वी 'पालकनीती' च्या संपादकांनी या पुस्तकाचे मराठीकरण करण्याविषयी विचारले. काम सोपे नसणार याची पूर्ण जाणीव असूनही लगेच होकार दिला. बंधन स्वीकारून मोकळी झाले !....

मन दहाएक वर्षे मागे गेले. कृष्णकुमारांच्या पुस्तकाचे पहिले वाचन केलेले आठवले. सूनृताच्या भाषाविकासाचे आई म्हणून करायला मिळालेले निरीक्षण, त्याच्या वेळोवेळी ठेवलेल्या नोंदी आठवल्या. पुण्याच्या अक्षरनंदन शाळेमध्ये मातृभाषेच्या शिक्षणाबाबत करून पाहिलेली धडपड आठवत गेली. सुट्या मुळाक्षरांनी वाचन-लेखनाची सुरुवात न करणे, मुलांना मुक्तपणे चित्रे काढायला देणे, मुलांचे म्हणणे ऐकून घेणे, या आणि अशा गोष्टी वर्गात कशा रुळवता येतील, याचा शाळा उभारताना तपशीलवार विचार होत गेला. सोबत घरी सूनृताचे आणि वर्गात मुलांचे जिवंत प्रतिसाद होते. मुले भाषेला कशी

भिडतात, त्यांच्या एकंदर वाढीच्या प्रक्रियेत, शिक्षणात भाषेचे स्थान कसे महत्त्वाचे आहे याचा प्रत्यय वेळोवेळी येत होता. सुरुवातीच्या काळात पालकांची निखळ साशंकताही सोबत होती. '...पण या पद्धतीनं मुलं वाचायला शिकतील ना ?' असे अनेक पालकांनी समोर बसून विचारलेले आजही आठवते. रूपांतरासाठी पुस्तक पुन्हा वाचून काढले, पुन्हा पुन्हा वाचून काढले. तेव्हा दरम्यानच्या काळातले अस्सल काम गाठीशी होते. कोल्हापुरातील परिषदेत कृष्णकुमारांचे बीजभाषण ऐकायला मिळाले होते. अक्षरनंदनला कृष्णकुमारांनी दिलेली भेट, प्राथमिक शाळेतल्या मुलांशी झालेल्या त्यांच्या गप्पा यांचा संदर्भ मनात होता.

फेरवाचन करताना काही वाक्यांपाशी मला मुले आठवली, त्यांचे लेखन आठवले, अनेक दिशांनी फुलत जाणारे त्यांचे प्रतिसाद आठवले, त्यात उमटणारे व्यक्तिवैविध्य आठवले, सोबतच्या इतर शिक्षकांना भाषेच्या पाठासाठी सुचवलेल्या गोष्टी आठवल्या, स्वत: घेऊन दाखवलेले पाठ आठवले आणि सुनृताची भाषा कशी घडत गेली हेही आठवले. या सगळ्यांमुळे पुनर्वाचनातून बरेच काही नव्या खोलीने समजत गेले.

अक्षरनंदन शाळेच्या दैनंदिन जबाबदारीतून मोकळीक घेतल्यानंतर वेगवेगळ्या शाळांबरोबर काम सुरू केले. शहरी भागातल्या आणि ग्रामीण भागातल्या शाळा अगदी जवळून पहायला मिळाल्या. अनेक चौकटींमध्ये अडकून पडलेल्या या शाळांमधल्या ओस भिंती, त्यावर तैलरंगाने रंगवलेली बोधवाक्ये, चिडीचूप बसलेली आणि धडेच्या धडे उतरवून काढणारी मुले, विविध योजनांमधून मिळालेल्या पुस्तकांवर साठलेली धूळ, 'ग' गणपती, 'ग' ला काना 'गा', य यज्ञ, गाय, र रथ 'र' ला काना रा, न नथ, 'न' ला काना ना, 'त' तराजू रानात, 'ज' जहाज 'ज' ला काना जा,'त' तराजू, 'त' ला एक मात्रा ते, जाते, असे वाचणारी मुले...., 'ही आहे ना, हिला काही, येतच नाही', 'हा ना, ढ गोळा आहे नुसता' असे मुलांसमोर वरचेवर सहज म्हणणारे शिक्षक... एक ना दोन. कृष्णकुमार 'आपल्याकडच्या शाळां' मधल्या वास्तवाबद्दल बोलतात, त्याचा अनुवाद करताना हे वास्तव मनात उभारून आले, गळा दाटून आला. इथपर्यंत काम करून झाले की झोपायचे असे ठरवूनही, रूपांतर

लागू नये.

भारतातल्या शाळा, खाजगी आणि शासकीय शाळांमधली वंचित मुले, शिक्षणव्यवस्थेत भिनलेली संकुचितता, याविषयीचे भान आणि शिकणे म्हणजे नेमके काय, ते कसे विकास पावते, भाषा शिकायला मदत करायची म्हणजे नक्की काय करायचे ? याबाबतची जाण आणि आस्था यामुळे कृष्णकुमारांचे लेखन यथार्थतेच्या फार वरच्या पातळीवर पोहोचते. भारतात आणि जगात भाषाशिक्षणाच्या संदर्भात काम केलेल्या विचारवंतांकडून या पुस्तकासाठी मी मुक्तहस्ताने विचार घेतले आहेत, असा उल्लेख प्रस्तावनेत त्यांनी केला आहे. पण त्या विचारांना त्यांच्या स्वत:च्या दृष्टीची जोड इतकी योग्य पद्धतीने मिळत गेलेली दिसते की अनेकांचे विचार त्यात उमटलेले असूनही लेखनाच्या एकजिनसीपणाला कुठेही बाधा आलेली नसल्याचे प्रकर्षाने जाणवते.

भाषेबद्दल, मुलांच्या भाषेबद्दल, भाषाशिक्षणाबद्दल ऊहापोह करताना हे पुस्तक शिक्षकांसाठी आहे याचे भान कुठेही सुटलेले नाही, हे या पुस्तकाला यथार्थ बनवणारे आणखी एक महत्त्वाचे कारण. वर्गात पाठ कसे घ्यावेत, हे या लहानशा पुस्तकातही कृष्णकुमारांनी आवर्जून, बारकाईने सुचवलेले आहे. आपल्याकडच्या शिक्षकांनी हे सारे करून पाहावे अशी आत्यंतिक कळकळ त्या बारीक सारीक सूचनांमध्ये दिसते.

गेले वर्षभर मी एकीकडे भाषांतर करीत होते तर दुसरीकडे साच्यातल्या शाळांमध्ये वावरत होते. तिथे भाषा-शिक्षणाबाबत काही करून पाहात होते, 'शिकणे' म्हणजे काय हे समजलेले नसतानाच शिकवणाऱ्या शिक्षकांशी संवाद साधत होते, चिडीचूप बसणाऱ्या, पुढे बोलावले तर सुरुवातीच्या काळात थरथरणाऱ्या, कोणत्याही प्रकारची मागणीच न करणाऱ्या मुलांसोबत थेटच प्रयोग करून बघत होते, वस्तीत मी दिसल्यावर दुरून हाक मारणारी, ''आमच्या वर्गात या ना, गाणं म्हणू या ना'', अशा मागण्या करू लागलेली मुले, रंगीत चित्रांचे पुस्तक हातात धरायला मिळाल्यावर बदललेले त्यांचे चेहेरे, थोड्या प्रमाणात का होईना साहित्य वापरायला लागलेले शिक्षक, या सर्वांमुळे, मी करीत होते त्या मराठीकरणाच्या कामाची अर्थपूर्णता व्यक्तिगत पातळीवर

पोटातल्या अर्थासकट आशय मराठीत आणायला सुरुवात केली, तसे पुस्तकातल्या विचारांचे आणखी, सूक्ष्म, तरल अर्थ उमगले. कृष्णकुमारांना यातून नेमके काय म्हणायचे आहे हे स्वत:शीच उकलून बघताना, कधी कधी मराठी रूपांतराबद्दल समाधान न वाटणे, कधी कधी एकदम एखादी चपखल रचना मनात चमकून जाणे, कधी कधी नेमका अर्थ कवेत घेता यावा म्हणून दिवस दिवस अडून राहणे, अशा अनेक अनुभवांतून जायला मिळाले.

कृष्णकुमारांच्या भाषाशिक्षणाविषयीच्या लेखनात खोलवर डुबी मारण्याची संधी हे काम करताना मिळाली. पुन:प्रत्ययाचा आनंद म्हणजे काय चीज असते याचा अनुभव पानोपानी येत गेला. अक्षरनंदनमधल्या आणि अन्य शाळांमधल्या मूलभूत कामामधून मिळालेली भाषाशिक्षणाबाबतची मर्मदृष्टी, काहीशा व्यापक आणि कठोर वास्तवात पडताळून बघत असतानाच एकीकडे कृष्णकुमारांच्या विचारांच्या अर्थांचे अनेक पदर उकलून बघणे, त्या विचारांच्या गाभ्यापर्यंत पोहोचणे आणि मूळ विचारांना धक्का लागू न देता मराठीमध्ये ते बांधणे हे दमवणारेही होते आणि आनंदाचेही. पुस्तकाच्या गाभ्याला न्याय देण्याशी ठाम राहून यथाशक्ती केलेल्या या मराठीकरणातल्या त्रुटींची जबाबदारी सर्वस्वी माझी !

शहरातल्या, ग्रामीण भागातल्या, अतिदुर्गम भागातल्या मराठी शाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी, तेथे वाढणाऱ्या मुलांसाठी हे पुस्तक मराठीत आणण्याच्या कामी आपला वेळ, मन आणि कसब लावता आले, यातून मला जे मिळाले ते मोजण्याच्या पलीकडचे आहे.

पुणे — वर्षा सहस्रबुद्धे

फेब्रुवारी, २००४.

## भूमिका

इस पुस्तक का मराठी में अनुवाद और प्रकाशन — और वह भी पुणे से — मेरे लिये व्यक्तिगत महत्व की घटना है। शिक्षा और संस्कृति के अनेक सवालों पर हिन्दी और मराठी आज साथ-साथ संघर्ष कर रही हैं। हिन्दी क्षेत्र में शिक्षा, और एक भाषा के रूप में हिन्दी की शिक्षा, में पसरी हुई जड़ता के कई संदर्भ मराठी के लिये भी प्रासंगिक हैं, भले ही महाराष्ट्र में शिक्षा का विकास हिन्दी क्षेत्र से कहीं अधिक हुआ है। मैंने स्वयं महाराष्ट्र की संस्कृति से बहुत कुछ सीखा है और मेरे बचपन की एक सुंदर, मासिक निधि — अंग्रेज़ी में प्रकाशित होने वाली 'सनशाइन' पत्रिका — पुणे से आती थी। 'बच्चे की भाषा और अध्यापक' के मराठी में अनुवाद से मैं महाराष्ट्र के साथ अपने इस पुराने रिश्ते में नई प्रगाढ़ता महसूस कर रहा हूँ और इसके लिये वर्षा सहस्रबुद्धे का आभारी हूँ। मुझे भरोसा है कि उनका यह प्रयास प्राथमिक स्तर के शिक्षकों के बीच भाषा सीखने की प्रक्रिया के प्रति नई दृष्टि की ज़रूरत का प्रसार करेगा।

31 जनवरी 2004 — कृष्ण कुमार

## प्रस्तावना

मुलांच्या विकासात भाषाशिक्षणाचे स्थान महत्त्वाचे आहे हे सर्वमान्य आहे. या क्षेत्रात नवनवीन दिशा शोधण्याचे फारसे प्रयत्न मात्र झालेले नाहीत. विज्ञान, आरोग्य, पर्यावरण या विषयांसाठी अभिनव शिक्षण-पद्धती शोधणाऱ्या बऱ्याच संस्था आहेत. तेथे असे लक्षात आले आहे की कमजोर भाषा-शिक्षण हा मोठाच अडसर ठरतो. मुलाच्या विकासाच्या प्रक्रियेत भाषेच्या दुव्याची जागा कळीची ठरते, असा सर्वसामान्य प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा अनुभव असतो. हा दुवा जर कच्चा राहिला, तर मुलाच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट गाठणे कठीण बनते. बालसंगोपन असो, मुलांशी संवाद साधायचा असो किंवा मुलांचा चौकसपणा, त्यांच्या वेगवेगळ्या कृती यांना प्रोत्साहन द्यायचे असो - भाषेचे स्थान अगदी गाभ्याचे ठरते. भारतामध्ये प्रयोगशील शिक्षणतज्ज्ञांकडूनही दीर्घकाळ भाषेच्या क्षेत्राकडे पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही. अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, शिक्षक प्रशिक्षण आणि अध्यापनपद्धती या सर्वच अंगांनी 'भाषा शिकवणे' अधिक सबळ करण्याची नितांत आवश्यकता आहे.

बालकांच्या शिक्षणात रस असणाऱ्या संस्थांना या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे नवनवीन प्रयोग करण्याच्या दिशेने जाण्याची प्रेरणा मिळेल अशी आम्हाला आशा वाटते. आपल्या नित्याच्या दिनक्रमातही बालवाडी, अंगणवाडी आणि प्राथमिक शाळांच्या शिक्षकांना या पुस्तकाचा वापर करता येईल. यातली वर्णने वाचताना त्यांच्या लक्षात येईल, की विशेष खर्च न करताही या कृतींचे आयोजन करता येते. नवीन साहित्य कसे मिळवावे किंवा कसे बनवावे याविषयीची माहितीसुद्धा यातून मिळेल.

प्रशिक्षण-संस्थांमधल्या मंडळींनाही या पुस्तकाचा उपयोग होईल. पुस्तकात वर्णन केलेल्या कृतींचा थेट अनुभव आणि त्या कृतींच्या पायाशी असणाऱ्या दृष्टिकोणाबाबतच्या चर्चा - या दोहोंमुळे प्रशिक्षण अधिक प्रभावी होईल. शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांकडून या पुस्तकाचा मोठ्या प्रमाणावर वापर होईल अशी आशा आहे. या पुस्तकाचा वापर करून बघितल्यानंतर आपली मते, अभिप्राय, सूचना कळविल्यास त्यांचे स्वागतच होईल .

१९८५ च्या उन्हाळ्यात मध्यप्रदेशातील टिकमगढ येथील बाल-साहित्य-केंद्रात या पुस्तकातील कृती प्रत्यक्ष करून बघितल्या. भल्या सकाळी साडेसहा वाजता मुले केंद्रात येत, कृतींमधे सहभागी होत. ज्या दृष्टिकोनातून मी विचार करीत होतो, त्याच्या व्यावहारिक बाजूंचा अभ्यास करण्यामध्ये त्या मुलांची मदत झाली. त्या मुलांचा मी मनापासून कृतज्ञ आहे. केंद्रात या कृतींचे आयोजन करण्यामधे गुरबचनसिंग आणि फूलचंद्र जैन यांची मदत झाली. त्यांच्याविषयीची कृतज्ञताही मी येथे व्यक्त करतो.

या शतकातल्या भाषेच्या शिक्षणशास्त्रातील जाणकारांचा मी अर्थातच ऋणी आहे. फार उद्धरणे देण्याने पुस्तकाला एक प्रकारचे विद्वत्ताप्रचुर असे रूप आले असते आणि मग त्यामुळे काही लोक त्याच्या वाटेसच गेले नसते. म्हणून मी थेट उद्धरणे दिली नाहीत, हे खरे. पण जॉन टफ, सिल्विया ॲश्टन वॉर्नर, जेम्स ब्रिटन यांच्या कामामधून मी सढळपणे पुष्कळ काही घेतले आहे. फ्रँक स्मिथ, पियाजे, वायगॉट्स्की, चुकोव्स्की, गिजुभाई आणि रवींद्रनाथ टागोर यांचे वाचन करताना मिळालेल्या कल्पनांचा मी मुक्तपणे वापर केला आहे. भारतीय वातावरणात बालककेंद्री शिक्षणशास्त्रानुसार प्रत्यक्षात काही करणे शक्य आहे या विश्वासाने काम करीत राहायला हवे, अशी प्रेरणा मला गिजुभाई आणि टागोर यांच्याकडून मिळाली.

हा विश्वास सर्वदूर पसरावा, याकरताच मी ही हस्तपुस्तिका लिहिली. याचे लेखन करण्याची संधी दिल्याबद्दल मी युनिसेफचा आभारी आहे. पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शाळांतील मुलांचे शिक्षक, या शिक्षकांचे प्रशिक्षक, पर्यवेक्षक, अभ्यासक्रम तयार करणाऱ्या व्यक्ती यांना हे पुस्तक मिळेल, कदाचित ते काही पालकांपर्यंतही पोहोचेल. आपल्या शिक्षणव्यवस्थेला मृदुतेचे परिमाण देण्यात या पुस्तकाचा थोडासा हातभार लागेल आणि अखेरीस मुलांना शाळा ही छान, मजेची जागा वाटू लागेल, तिथून त्यांना परतावेसे वाटणार नाही अशी आशा करतो.


-कृष्णकुमार

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. भाषा म्हणजे काय? | १ |
| २. बोलणे | १६ |
| ३. वाचणे | ३७ |
| ४ लिहिणे | ६० |
| ५. पाठ्यपुस्तके परीक्षा आणि अवकाश | ७६ |

# प्रकरण एक

## भाषा म्हणजे काय?



भाषा हे संवादाचे साधन आहे अशी व्याख्या करणे आपल्यापैकी बहुतेकांच्या इतके अंगवळणी पडले आहे, की विचार करणे, संवेदना किंवा जाणीव होणे आणि प्रतिसाद देणे या सर्वांचे साधन म्हणूनही भाषा फार उपयोगाची आहे हे आपण अनेकदा विसरतो. लहान मुलांबरोबर काम करणाऱ्यांच्या दृष्टीने भाषेचा हा व्यापक उपयोग फारच महत्त्वाचा आहे कारण मुलाचे व्यक्तिमत्त्व आणि क्षमता यांच्या विकासाला बाल्यावस्थेत भाषेमुळे आकार येत असतो. मुलाची जगाकडे बघण्याची दृष्टी, रुची, क्षमता, मूल्ये आणि वृत्ती अशा अनेक गोष्टींना भाषा सूक्ष्मपणे तरीही प्रचंड ताकदीने आकार देत असते. कसे, ते या पुस्तकात, विशेष करून या प्रकरणात मांडले आहे.

बऱ्याचदा विवाद्य ठरणारा मुद्दा प्रथमच स्पष्ट करण्याची गरज आहे. शाळेच्या शिक्षकांना शाळेतला एक विषय म्हणून हिंदी, इंग्रजी किंवा अन्य एखाद्या भाषेकडे बघण्याची सवय असते. त्यामुळे एखादी विशिष्ट भाषा शिकवण्याकरता हे पुस्तक लिहिले आहे असे त्यांना वाटू शकेल. तज्ज्ञ मंडळींच्या विचारपद्धतीने 'मुलाची पहिली भाषा, दुसरी भाषा' असा विचार केला जातो. एखाद्या भाषेचे नियम, तिच्या रचना, शब्दसंग्रह यांचे वर्णन भाषेबद्दलच्या पुस्तकात सुरुवातीला असायला हवे असे शिक्षक आणि तज्ज्ञ या दोघांनाही वाटते.

या पुस्तकाच्या बाबतीत मात्र यापैकी काहीच लागू होत नाही. अमूक एखादी भाषा शिकवण्यासाठी मार्गदर्शक म्हणून हे पुस्तक लिहिलेले नाही. मुलांच्या जीवनात एखादी भाषा नेमके काय काम करते याविषयी ऊहापोह करणारे हे पुस्तक आहे. मातृभाषा कोणतीही असो. जगातले प्रत्येक मूल काही हेतूंची तत्काळ पूर्तता होण्यासाठी भाषेचा वापर करीत असते. यापैकी एक महत्त्वाचा हेतू म्हणजे भोवतालच्या जगाचा अर्थ लावणे. हा हेतू साध्य करण्यासाठी भाषा एक अजब साधन ठरते. जोपर्यंत आपण मुलाच्या दृष्टिकोनातून पहात नाही, भाषा त्याच्या जीवनात काय काय करते हे समजून घेत नाही, तोपर्यंत शिक्षक, पालक किंवा संगोपनकर्ते म्हणून आपली भूमिका आपल्याला नेमकी समजणार नाही.

### भाषा आणि 'करणे'

मुले हातांनी, शरीराचा वापर करून काही ना काही करीत असतात, वस्तूंशी त्यांचा संपर्क येतो - याचा आणि मुले भाषा कशी वापरतात याचा फार घनिष्ठ संबंध आहे. बाल्यावस्थेत असताना शब्द आणि कृती हातात हात घालूनच येतात. कृती आणि अनुभव यातून शब्दांची गरज निर्माण होते आणि अनुभव संपून गेल्यानंतरही त्याच्यापर्यंत पोचण्याची वाट शब्द निर्माण करतात. मुलांचा ज्या वस्तूंशी संपर्क येतो, त्या वस्तूंबरोबरचे मुलांचे नाते शब्दांमुळे अधिक समृद्ध होते. त्याचबरोबर कृतिविरहित शब्द, वस्तूंशी संबंध न येता मिळालेले शब्द मुलांच्या दृष्टीने पोकळ आणि अचेतन ठरतात. 'माऊ', 'पळ', 'पड', 'निळा', 'नदी', 'खरखरीत' हे शब्द प्रथमच शिकताना मूल जर प्रत्यक्ष कृतीत गुंतलेले नसेल किंवा एखाद्या वस्तूशी जोडून हे शब्द आले नाहीत, तर त्यांचा खरा अर्थ मुलांना फारसा समजलेला नसतो. अशा प्रकारच्या घनिष्ठ संबंधानंतरच हे शब्द एखाद्या प्रतिमेशी जोडले जातात आणि भविष्यात त्यांचा अर्थपूर्ण उपयोग करण्यासाठी उपलब्ध होऊन राहतात.

शब्द आणि मुलाचे प्रत्यक्ष अनुभव यातल्या नात्यामुळे प्रौढांवर, विशेषतः शिक्षकांवर एक अनन्यसाधारण अशी जबाबदारी येऊन पडते. जे आता आपले विद्यार्थी आहेत, त्यांच्या पालकांनी त्यांना बहुविध अनुभव आधी पुरवलेच असणार असे शिक्षकांना वाटू शकेल. मात्र असे अनुभव मुलांना न देणारे असेच खूपसे पालक असतात. आपल्या अगदी बाल्यावस्थेतल्या मुलांचा असंख्य वस्तूंशी संबंध येऊ देण्यासाठी आवश्यक असणारा आत्मविश्वास बऱ्याच

पालकांना नसतो किंवा मुले ज्या संथगतीने वस्तू निरखतात, काही ना काही करतात त्या गतीशी जुळवून घेण्याएवढा वेळच पालकांना नसतो! मूल जर नळाच्या धारेखाली बोटे धरून अर्धा तास उभे राहिले किंवा घरातली झाडून सगळी भांडी मुलाने जमिनीवर मांडली किंवा घरातली एखादी छत्री मुलाला असंख्य वेळा उघडून बंद करून पहावीशी वाटली, तर मोठ्या माणसांना तो वैतागच वाटतो. काही वेळा वस्तूंची फूटतूट, खराबी होऊच नये, मुलाला इजा होऊ नये म्हणून मुलाला अनेक अनुभवांपासून वंचित रहावे लागते आणि अगदी मोजकेच अनुभव त्याच्या वाट्याला येतात.

पालकांनी काही केलेले असो किंवा नसो, शिक्षकाचे काम बरेचसे स्पष्ट आहे. भाषेचा वापर आणि जीवनानुभव, प्रत्यक्ष वस्तू यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न मुलाला सतत करता येईल असे वातावरण शिक्षकाने निर्माण करायलाच हवे. असे वातावरण निर्माण करण्यासाठी काही गोष्टी खात्रीशीरपणे व्हायला हव्यात -

- मुलांनी पाने, दगड, पिसे, काटक्या अशा अनेकविध वस्तू शाळेत आणायला हव्यात, त्यांच्याविषयी बोलायला हवे, त्यांच्याविषयी वाचायला आणि लिहायला हवे.
- शाळेत आणि शाळेबाहेर मुले जे अनुभव घेतात, त्या अनुभवांविषयी मुलांना बोलते, लिहिते आणि वाचते केले जायला हवे.
- मुलांना वर्गाबाहेर न्यायला हवे. तिथे मुले साध्या साध्या वस्तू काळजीपूर्वक निरखतील, पारखतील आणि त्यांच्याविषयी बोलतील.उदा. मोडका पूल, चिखलाचे डबके, मेलेला किडा, घरटे आणि त्यातली अंडी इ. शाळेच्या लगतच्या परिसरातल्या अशा 'अभ्यास-सहली' भाषा शिक्षणाचे बहुमोल असे स्रोत ठरतात. या पुस्तकात पुढे याविषयीचे विवेचन आहे.

अशा रीतीने जिथे मुले हाताने विविध गोष्टी करून बघत नाहीत, तर बराचसा वेळ बसून फक्त शिक्षक काय बोलतील त्याची श्रवणभक्ती करतात, जिथे हाताळून बघायला, मोड-जोड करायला मुलांसाठी वस्तूच नाहीत अशी शाळा भाषाविकासासाठी योग्य जागा नव्हे.

## भाषा वापरून मुले काय काय करतात?

मुलांच्या भाषेचे अभ्यासक असे सांगतात की एकदा का मुलांनी बोलण्यासाठी जरूर त्या किमान भाषिक क्षमता मिळवल्या की आपण स्तंभित होऊन जाऊ इतक्या विविध उद्देशांनी मुले भाषेचा वापर करू लागतात. त्यापैकी काही उद्देशांचे विवरण पुढे केले आहे :

### १. स्वतःच्याच कृतींना दिशा देणे

बऱ्याचदा, काहीतरी करत असताना आपण काय करतो आहोत याबद्दल मुले बोलत असतात. ते आपल्या स्वतःच्या कृतीचे व्यक्तिगत स्वरूपाचे धावते वर्णनच असते. बऱ्याचदा असे दिसते, की या धावत्या वर्णनामुळे हातातले काम करत राहण्यातला रस टिकून राहायला मदत होते. कोणी ते वर्णन ऐकते आहे की नाही, हे तिथे महत्त्वाचे असत नाही. उदाहरणार्थ, ओल्या वाळूच्या किल्ल्यात बोगदे करणाऱ्या चार-आठ मुलांपैकी प्रत्येकजण स्वतःचे धावते वर्णन ठरेल असे काही ना काही पुटपुटत असते आणि पुष्कळदा ती केवळ ऐकू येईल न येईलशी गुणगुण असते.

तीन ते आठ या वयोगटातले एखादे मूल आत्ममग्नपणे आपले आपले काही करताना - अगदी खेळतानाही - त्याचे निरीक्षण करा. ते काय बोलते हे लक्षपूर्वक ऐका. वेगवेगळ्या वयाच्या आणखीही मुलामुलींचे असेच निरीक्षण करा. त्यांच्या स्वगत - बोलण्यांमधे काही फरक आढळला का? बोलण्यामुळे कृतीत रमायला मुलाला मदत झाल्याचे आढळले का? याचे कारण काय असावे?

### २. इतरांचे लक्ष वेधणे, त्यांच्या कृती 'वळवणे'

आपण पालक आणि शिक्षक भाषेच्या या वापराशी चिरपरिचित आहोत कारण आपला खूपसा वेळ मुलांच्या मागण्या पूर्ण करण्यात जातो. शारीर प्रकारच्या मागण्यांबाबत आपण साधारणपणे बरेच जागरूक असतो. मात्र त्याहून

कथेचा एक नमुना म्हणून हत्ती आता का उडू शकत नाहीत हे स्पष्ट करणारी पुढे दिलेली कथा पहा. अशा कथांचा भाषाशिक्षणात वापर कसा करावा हे 'बोलणे' आणि 'वाचन' या प्रकरणांमधे दिले आहे.

### उडते हत्ती

*कोणे एके काळी, फार फार वर्षांपूर्वी, भारतातल्या हत्तींना उडता येत होतं. तेव्हाही हत्ती आतासारखेच अवाढव्य होते. ढग म्हणजे हत्तीची मावस-चुलत भावंडं. या भावंडांप्रमाणंच त्यांचाही रंग काळा होता. आणि या ढगांप्रमाणंच हत्तीही, आपले सुपासारखे कान खालीवर करत आकाशात उडू शकत.*

*ढग आपले आकार बदलू शकतात, तसे हत्तीही आकार बदलू शकत असत. त्यांना कुणाहीसारखं होता येत असे–ड्रॅगनसारखं, राक्षसी मांजरासारखं. एवढंच काय पण ते किल्ल्यासारखे, डोंगरासारखे, धूम पळणाऱ्या कुत्र्यासारखे –कुणाहीसारखे दिसू शकत असत.*

*कडक उन्हाळ्याचे दिवस होते. एक दिवस हे नितळ काळ्या रंगाचे हत्ती स्वच्छ सूर्यप्रकाशात उडत होते. त्यांनी वेगवेगळ्या जागी भराऱ्या मारल्या. एका गावात छोटी मुलं खेळत होती तिथून, एका शेतात शेतकरी नांगरत होता तिथून, एका नदीमधे एक मुलगा काळ्या म्हशींना अंघोळ घालत होता तिथून,... आणि मग माकडांच्या ओरडण्यानं दुमदुमून गेलेल्या एका रानाच्या वरून... वर उंच आभाळात उन्हाच्या गरमागरम झळा घेऊन वारा वाहत होता. त्याला हत्ती दिसले. तो हत्तींपाशी गेला आणि थेट त्यांच्या सोंडेत शिरला. वारा मिऱ्यांसारखा झणझणीत होता!*

*हत्ती फुरफुरले आणि सटासट शिंकले–आऽक् छी! त्या झळांपासून दूर जाण्यासाठी जागा शोधू लागले. खाली त्यांना आंब्याची झाडं दिसली. मोहोराचा वास येत होता. जिथं झाडांची सावली होती तिथं गारवा होता. त्यातल्या सर्वात मोठ्या झाडाच्या फांद्यांवर बसायला हत्ती हळू हळू खाली उतरू लागले.*

*एक गुरुजी आणि त्यांचे विद्यार्थीही त्याच झाडाखाली बसले होते. त्या दिवशी शाळेच्या वर्गात खूपच गरम होत होतं. गुरुजींना अगदी थकवा आला होता आणि मुलंही अस्वस्थ होती. आपल्या पेन्सिली त्यांनी मोडल्या. त्यांची एकूण एक उत्तरं चुकली. ती खुसुखुसु हसत होती आणि उंदरासारखे आळोखेपिळोखे देत बसली होती. त्यांना स्वस्थ बसणं शक्यच होत नव्हतं!*

*गुरुजी वैतागले. त्यांनी पाय आपटला, छडी वरखाली केली आणि ते मुलांवर ओरडले. ते स्वतःशीच म्हणाले, 'आता जर का ही मुलं स्वस्थ बसली नाहीत, तर मी जादूचा मंत्र म्हणेन आणि सगळ्यांचे ससुले करून टाकेन!' असं म्हणत वर्गातल्या सर्वात खोडकर मुलाला ते बखोटीला धरणार तेवढ्यात आकाशातून खाली येणारे हत्ती तिथं पोचले आणि गुरुजींच्या डोक्याच्या वर असलेल्या फांदीवर बसले.*

*कड् कड् कडाड्कन् फांदी मोडली आणि गुरुजींच्या डोक्यावर पडली. गुरुजी कोलमडले पण हत्ती अगदी निश्चिंत होते. त्यांनी शांतपणे पंख फडफडवले आणि ते पुढच्या झाडाकडं झेपावले.*

*त्याच क्षणी गुरुजींनी उडी घेतली आणि ते हत्तींवर ओरडले, ''हत्तींनो, दुष्ट कुठले! मी... मी दाखवतोच तुम्हाला. मला पाडता काय? धडाच शिकवतो तुम्हाला!'' हत्तींकडं बोट करून त्यांनी जादूचा मंत्र म्हटला.*

*हळू हळू हत्ती अलगद जमिनीवर उतरले. त्यांना मग उडताच येईना. त्या दिवसापासून आजतागायत हत्ती जमिनीवर चालत आहेत. जेव्हा जेव्हा मान वर केल्यावर हत्तींना आकाशात ढग वाऱ्याबरोबर तरंगताना दिसतात, तेव्हा तेव्हा त्यांना जुने दिवस आठवतात... आवडेल ते रूप घेऊन, हव्या तशा भराऱ्या हत्ती मारत असत, ते दिवस ...!*

**५. जीवनाची प्रातिनिधिक मांडणी**

भाषेच्या बाकीच्या उपयोगांबरोबर हाही उपयोग असतोच परंतु त्याचा अभ्यास स्वतंत्रपणे करायला हवा, नाहीतर त्याकडे दुर्लक्ष होईल. मोठ्या माणसांप्रमाणेच मुलेसुद्धा भूतकाळातले काहीतरी आठवण्यासाठी भाषेचा वापर करत असतात. भूतकाळातली एखादी घटना, व्यक्ती किंवा एखादी अगदी छोटीशी बाब, जे घडून गेले आहे, आता जे अवतीभवती नाही ते शब्दांच्या द्वारा आपण पुन्हा निर्माण करू शकतो. हे पुन्हा निर्माण केलेले अनेकदा इतके खरे वाटते की त्याविषयी आपण कितीतरी वेळ बोलत राहू शकतो.

आलेल्या अनुभवांचा अगदी आतल्या भावनिक पातळीवर स्वीकार करण्यासाठी, विविध गोष्टींशी जुळवून घेण्यासाठी मुले त्यांची भाषेत मांडणी करत असतात. कशाची तरी भीती वाटली, तर मूल त्याबद्दल पुन्हा पुन्हा बोलते, तो अनुभव पचनी पडेपर्यंत बोलते. जेव्हा एखादा नवीनच विस्मयकारक अनुभव जीवन मुलापुढे ठेवते, तेव्हा अनिश्चिततेपोटी, गोंधळलेपणापोटी, भीतीपोटी विस्मय निर्माण होतो. या विस्मयकारक धक्क्यातून सावरण्याकरता मूल तो प्रसंग पुन्हा पुन्हा शब्दातून व्यक्त करते. असे करण्यातून मूल त्या अनुभवाशी परिचित होते.

**६. एकरूप होणे**

कुणीतरी स्वतःचा किंवा दुसऱ्याचा अनुभव किंवा एखादी गोष्ट सांगते. ऐकताना त्यातल्या व्यक्तिरेखा, प्रसंगाची वर्णने यांच्याशी आपण एकरूप होतो. या एकरूपतेसाठी आपले प्रत्यक्ष जगणे, आपल्या पूर्वानुभवांची मर्यादा यांना ओलांडून जावे लागते. धातूच्या एखाद्या खेळण्याला 'काय वाटते' याविषयी जेव्हा मूल बोलते, तेव्हा मूल स्वतःच ते खेळणे असल्याची कल्पना करत असते. दुसरा कशातून जातो आहे याची कल्पना भाषेमुळे आपल्याला येते, अगदी दुसऱ्याच्या जागीच असल्याप्रमाणे.

**७. अंदाज बांधणे**

न घडलेल्या किंवा कधीच घडणार नाहीत अशा गोष्टी हा नेहमीच बोलण्याचा एक विषय असतो. आपली भीती, आपले बेत, आपल्या अपेक्षा आणि विचित्र परिस्थितीत काय घडेल असे आपल्याला वाटते याबद्दल मुले खूपदा बोलतात. शब्दांतून त्यांना भविष्यकाळाची प्रतिमा निर्माण करता येते. काही वेळा, भविष्यकाळ वास्तवात उतरवण्यासाठी तर काही वेळा, भविष्यकाळ जसा आहे तसा स्वीकारण्यासाठी या प्रतिमेची मदत होते.

**८. माहिती घेणे, कारण शोधणे**

कोणतीही, अगदी कोणतीही परिस्थिती ही छोट्या मुलासाठी 'समस्यात्मक' ठरू शकते आणि एखादी गोष्ट जशी आहे तशी ती का आहे हे मुलाला शोधून काढावे लागते. बऱ्याचशा समस्या अशा असतात, की मूल त्या यशस्वीरीत्या सोडवते. उदाहरणार्थ : बस अचानक का थांबली, आंघोळीच्या वेळी डोक्यावरून पाणी घातलेले आपल्याला का आवडत नाही, इत्यादि. सगळ्या मुलांना शब्दात त्याचे नेमके कारण उकलून सांगता आले नाही तरीही तीन वर्षांच्या लहानग्यांना या समस्या समजतात. ज्यांना कारण सांगायला जमते त्यांनी मोठ्यांना चौकशीसाठी, चर्चेसाठी भाषा वापरताना पाहिलेले असते आणि त्या प्रकारे भाषेचा वापर करायला या मुलांना प्रोत्साहनही मिळालेले असते.

वर उल्लेख केलेल्या समस्यांप्रमाणेच इतरही काही समस्या असतात आणि त्या शास्त्रीय पद्धतीने समजून घेणे मुलांना जमणारे नसते. उदाहरणार्थ - 'पाऊस का पडतो' किंवा 'सोसाट्याचा वारा सुटला की झाड का पडते' हे समजणे चार-पाच वर्षांच्या मुलाच्या आवाक्याच्या पलिकडचे आहे. तरीही, कारण समजून घेण्याचे साधन म्हणून भाषेचा वापर करण्याची उत्तम संधी अशा समस्यांमधून मिळते. दिलेले कारण किंवा स्पष्टीकरण अगदी अचूक आणि नेमके आहे की नाही हे इथे गौण ठरते. माहीत नसलेल्या कशाची तरी माहिती मिळवण्यासाठी साधन म्हणन मूल भाषेचा वापर करते हे इथे महत्त्वाचे ठरते. या हेतूने मोठ्या माणसांनी भाषा वापरलेली जितक्या वरचेवर मुलाच्या अनुभवाला येईल, तितकी या कामासाठी भाषा वापरण्याची शक्यता मुलाच्या आवाक्यात येईल.

**मुलांच्या पारंपरिक बडबडगीतांची तीन भाषांमधली उदाहरणे इथे दिली आहेत :**

(१) *दोणी दो दोणी दोणीयल्ली कूडी*
*हुट्ट हाकि तेलुवा हुट्ट हाकी तेलुवा*
*दोणी दो दोणी दोणीयल्ली कूडी*
*आचेदडवसेरुआ आचेदडवसेरुआ*
*दोणी दो दोणी दोणीयल्ली कूडी*
*नीरिनल्ली तेलुवा नीरिनलितेलुवा*

(२) *अंदा मंदा गिरगिर चंदा*
*अर्धी भाकरी सगळा कांदा*
*छोट्या बाळा तीट टिळा*

(३) *अटक मटक चवळी चटक*
*चवळी लागली गोड गोड*
*जिभेला आला फोड फोड*
*फोड काही फुटेना*
*मामा काही उठेना*

(४) *आज तो मारी मोटी बेनने*
*फुग्गा आण्या चार*
*वेची आप्या चार*
*फुग्गो मे तो गोल फुलाव्यो*
*जाणे मोटो चंदा जेवो*
*फुग्गो फुट्यो फट्ट*
*फुग्गो फुट्यो फट्ट*

**मूल ज्या वेगवेगळ्या आठ उद्देशांनी भाषेचा वापर करीत असते, ते ओळखण्यासाठी इथे एक स्वाध्याय दिला आहे. मुले जे बोलतात, त्याची उदाहरणे इथे आहेत. आठ निरनिराळ्या उद्देशांनुसार त्यांचे वर्गीकरण करा.**

(१) **'ढग गेले आणि पाऊस थांबला.'**
(२) **'आपडी थापडी गुळाची पापडी.'**
(३) **'असं नको करू. हे बघ इथे गट्टू आहे.'**
(४) 'रोज सकाळी पाणी इतक्या सगळ्या घरांपर्यंत कसं काय पोहोचतं?'
(५) 'आता मी कप इथे ठेवणार आणि रामूला हाक मारणार.'
(६) 'जितूकाका आले होते तेव्हा आणला होता ना, तसाच हा खाऊ आहे.'
(७) 'दिवाळी आली की मला नवीन शर्ट मिळणार!'
(८) 'तिथे बाजारासारखं होतं - इतकी बदकं होती! नुसता कलकलाट!'

**आपल्याच बोलण्याचा आपल्यावरील प्रभाव**

मुले ज्या वेगवेगळ्या उद्देशांनी भाषा वापरतात त्याविषयीच्या या विवेचनातून भाषेबद्दलची एक गोष्ट लक्षात येते. भाषा एक विलक्षण लवचिक असे माध्यम आहे. जीवनातल्या जवळजवळ प्रत्येक परिस्थितीत ते माध्यम लागू करता येते.

परिस्थितीनुसार भाषा वळवून - वाकवून आपण परिस्थितीशी अधिक चांगल्या रीतीने जुळवून घेत असतो. दैनंदिन जीवनातच या प्रक्रियेचे कितीतरी दाखले मिळतात. कुणीतरी आपल्यावर रागावले आहे हे जेव्हा आपल्याला कळते, तेव्हा आपण बोलण्यासाठी नकळत असे शब्द आणि सूर निवडतो, की त्यांच्यामुळे आपल्या मनातली दिशा परिस्थितीला मिळते. उदाहरणार्थ - लढायचेच असेल तर आपण कडक शब्द निवडतो; परिस्थिती थंडावण्यासाठी आपण मवाळ शब्द आणि सूर निवडतो.

अतिशय लवचिकपणे भाषेचा वापर करण्याच्या आपल्या क्षमतेनुसार

हेही ठरते, की जीवनातल्या विविध प्रकारच्या परिस्थितींना सामोरे जाऊन आपण त्यातून तगतो की नाही. एका पातळीवर, एखाद्या परिस्थितीला आपला असणारा प्रतिसाद भाषेतून आपण व्यक्त करतो, तर दुसऱ्या पातळीवर, आपली भाषाच परिस्थितीला आकार देत असते. सतत आपल्या अवतीभवती घडणाऱ्या गोष्टींशी जुळवून घेण्यासाठी भाषा आपल्याला मदत करत असते. आपण प्रत्यक्ष त्या प्रसंगात असलो किंवा त्यांच्याबद्दल केवळ विचार करत असलो तरी भाषेची आपल्याला मदतच होते.

एखाद्या प्रसंगाचे आपण प्रत्यक्ष साक्षीदार असलो किंवा नसलो, तरी त्या प्रसंगाचे वर्णन ज्या भाषेत असते, तिचा आपल्या प्रतिसादावर परिणाम होत असतो. आपल्यापासून दूरदूरच्या ठिकाणी रोज हजारो गोष्टी घडत असतात. वृत्तपत्रातल्या वर्णनांच्या रूपाने त्या आपल्यापर्यंत पोहोचतात. घडलेल्या घटनेचे चित्र रंगवण्याची मुभाच एका अर्थाने, वृत्तपत्रे आपल्याला देत असतात. रस्त्यात बघितलेली एखादी गोष्ट जेव्हा मूल आपल्या आईला सांगते, तेव्हा नेमके हेच घडते. वर्णनासाठी वापरलेली भाषा जितकी चपखल, तितके मुलाने किंवा वृत्तपत्राने निर्माण केलेले चित्र नेमके. वर्णन करणाऱ्याचा हेतू काय, यावरून वर्णनाची भाषा निवडली जाते आणि त्यामुळे अचूकतेची पातळी कमी -अधिक होऊ शकते. मुलाने जर अपघात बघितला असेल, आणि त्यामुळे मूल हबकून गेले असेल तर अपघाताचे वर्णन अतिशयोक्तीकडे झुकणारे असेल. अतिरंजित वर्णन करण्यातून त्याची भीती 'साधार' ठरते आणि पाहिलेल्या दृश्याशी जुळवून घेणे, ते दृश्य पचणे मुलाकरता सुकर होते.

आणि शेवटचा मुद्दा म्हणजे भाषा आपल्या अपेक्षांना आकार देते. शांतपणे, व्यवस्थिशीर रीतीने एखादी गोष्ट जो समजावून सांगू शकतो, तो इतरांकडूनही तशीच अपेक्षा करतो. तसेच, ज्याला खोलात जाऊन चौकशी करायला आवडते, त्याला नकळत असे वाटते की इतरांनाही अशी चौकशी करण्यात रस असणार. अशा लोकांनी विवेचनासाठी, किंवा चौकशीसाठी भाषेचा वापर केल्यामुळे, चौकसपणाचे महत्त्व जाणले जाईल असे वातावरण तयार होते. याचीच दुसरी बाजू म्हणजे, समाजात किंवा संस्थेत अशा कारणांसाठी भाषेचा वापरच होत नाही, अशा ठिकाणी वाढणारी मुले, निगुतीने केलेले विवेचन, शांतपणे केलेला वादविवाद यांच्याशी परिचित असण्याची शक्यता फारच कमी. मुख्यतः मुलांना काबूत ठेवण्यासाठीच जर पालक आणि शिक्षक भाषेचा वापर करत असतील, तर भाषा हे इतरांना नियंत्रित करण्याचे साधन आहे असेच मुलांना वाटू लागेल. कुणीतरी सांगितल्याशिवाय काहीही न करणारी मोठी माणसे अशा मुलांमधून तयार होतील.

दृष्टी, क्षमता, वृत्ती, आवडी आणि मूल्ये यांच्यासह मुलाचे व्यक्तिमत्व भाषेतून कसे घडते या मुद्यापासून आपण हे प्रकरण सुरू केले. आता आपण या प्रश्नाचे उत्तर असे देऊ शकू : भाषेने निर्माण केलेल्या वातावरणात मूल जगत असते, लहानाचे मोठे होत असते, त्यामुळे मुलाचे व्यक्तिमत्वच भाषेतून घडते. हे वातावरण निर्माण करण्यामध्ये शिक्षक मोठाच वाटा उचलू शकतात. मुलाच्या जीवनात भाषा कोणकोणती कामे करते याची जाणीव जर शिक्षकाला असेल, तर मुलाच्या भावनिक आणि बौद्धिक गरजांना शिक्षक प्रतिसाद देऊ शकेल. मुलाने वेगवेगळ्या प्रसंगी वापरलेल्या भाषेला शिक्षक काय प्रतिसाद देतो हे फार फार महत्त्वाचे ठरते. विशिष्ट प्रकारे भाषा वापरण्यामागचे मुलाचे उद्दिष्ट काय हे समजल्याचे शिक्षकाच्या प्रतिसादांमधून दिसले, तर मूल त्या विशिष्ट प्रकारे अधिक चांगल्या रीतीने भाषेचा वापर करू शकेल. मात्र, याउलट, योग्य काय, अचूक काय याविषयीच्या ठाम पूर्वग्रहावर आधारित असे शिक्षकाचे प्रतिसाद असतील, तर मुलाच्या स्वतंत्र अभिव्यक्तीत, संवादात ते अडसरच ठरतील.

◆ ◆ ◆

## प्रकरण २

# बोलणे



बोलणे ही चांगली गोष्ट नाही, अशा नकारात्मक दृष्टीने आपल्याकडच्या शाळांमध्ये बोलण्याकडे बघितले जाते. कुणी बोलत असेल तर शिकण्यासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या बाबींकडे तो दुर्लक्ष करीत आहे असे गृहीतच धरले जाते. त्यामुळे, मुले बोलत आहेत असे दिसताच शिक्षकाला त्यांना गप्प करावेसे वाटते. मधल्या सुट्टीत किंवा शिक्षक महत्त्वाचे काहीतरी सांगत नसेल तेव्हा मुलांना बोलण्याची मुभा असते.

बोलण्याकडे बघण्याची दृष्टी अशी असल्यामुळे शिकण्याच्या प्रक्रियेत बोलण्याचे जे असंख्य उपयोग आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष होत आले आहे. शिकण्याच्या कोणत्याही टप्प्याला हे लागू होते, बाल्यावस्थेतल्या शिक्षणाच्या बाबतीत तर हे फार फार खरे आहे. पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शाळातील मुलांच्या वयात 'बोलणे' हे शिक्षणाचे प्रमुख साधन असते. शिकलेल्या गोष्टी बोलण्यातून स्थिर, पक्क्या होत असतात. जिथे लहान मुलांना मोकळेपणाने बोलण्याचे स्वातंत्र्य नाही, अशी शाळा काय कामाची! खरोखरच, जे शिक्षक मुलांना बोलू देत नाहीत, त्यांनी पुस्तके वा अन्य साहित्य खरेदी करण्यासाठी पैसा नाही ही तक्रारच करू नये. कारण ज्याकरता एकही पैसा खर्च करावा लागत नाही, असे 'बोलण्या'सारखे मोलाचे साधन ते वाया घालवत असतात!

मुले अनेक कारणांनी बोलतात. त्यापैकी प्रत्येक प्रकारचे बोलणे हे शिक्षकासाठी उपयोगी ठरणारे असते असे नव्हे. उदाहरणार्थ, कंटाळा आला म्हणून तो घालवण्यासाठी बोलणे आणि काहीतरी विशेष दिसले म्हणून त्याकडे दुसऱ्याचे लक्ष वेधण्यासाठी केलेले बोलणे या दोन्हीत फरक आहे. दुसऱ्या प्रकारचे बोलणे हे शिकलेल्या गोष्टीचे स्थिरीकरण करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. नोंदवही भरणाऱ्या शिक्षकाच्या टेबलाशी थांबलेल्या दोन मुलांच्या कुजबुजीतून ही भूमिका स्पष्ट होते.

**पहिले मूल** : बाईंनी अंगठी घातलीए.

**दुसरे मूल** : तू आधी बघितली नव्हतीस?

**पहिले मूल** : नाही... अं... हो हो... पाहिली होती, पाहिली होती.

**दुसरे मूल** : अरे! पण ही अंगठी दुसरी आहे.

**पहिले मूल** : त्यांनी नवीन घेतली आहे अंगठी. ही लहान आहे अगं!

**दुसरे मूल** : नाही रे, ही बारीक आहे.

मुलांच्या या लहानशा संभाषणाचे विश्लेषण केले, तर बोलण्यातून त्यांना शिकण्यासाठी संधी मिळाल्याचे आपल्या ध्यानात येईल. पहिले मूल शिक्षिकेच्या बोटात दिसलेल्या अंगठीबद्दल काही बोललेच नसते, तर शिक्षिका नेहमीच अंगठी घालतात हे त्याला आठवलेही नसते. आणि दुसरे म्हणजे, हा संवाद जर घडला नसता, तर जुन्या आणि नव्या अंगठीतला फरक निरखणे तसेच 'लहान' आणि 'बारीक' यातला सूक्ष्म फरक समजणे या संधीला दुसरे मूल मुकले असते.

बोलण्याची ही विविध कार्ये लक्षात येण्यासाठी मुलांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकण्याची आपल्याला सवयच लागायला हवी. साधी वाटली तरी ही फार अवघड गोष्ट आहे. कारण मुलांनी काय करायचे, काय नाही हे सांगण्याचे काम आपण मोठे म्हणून आपले आणि ऐकण्याचे काम मुलांचे असे आपल्याला वाटते. मुले बोलतात तेव्हा चांगले श्रोते होण्यामध्ये या पूर्वग्रहामुळे अडसर येतो. कोणत्या कारणासाठी बोलले जात आहे हे शांतपणे समजावून घेणारा आणि त्या बोलण्यामुळे शिकण्याच्या कोणकोणत्या शक्यता निर्माण होत आहेत हे हेरणारा श्रोता चांगला.

कुठल्याही अगदी साध्याशा परिस्थितीत एकमेकांशी बोलणारी दोन मुले यापैकी काहीतरी करीत असतात.

१. आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या कशाकडे तरी लक्ष देणे,

२. त्याचे सहज किंवा नीट निरीक्षण करणे,

३. निरीक्षणांची देवाण-घेवाण करणे,

४. केलेल्या निरीक्षणांची काही एक नीट व्यवस्था लावणे,

५. एकमेकांच्या निरीक्षणांना आव्हान देणे,

६. निरीक्षणावर आधारित चर्चा करणे, वाद घालणे,

७. अंदाज बांधणे,

८. आधीचा अनुभव आठवणे,

९. दुसऱ्याच्या भावनांची, अनुभवांची कल्पना करणे,

१०. कल्पित प्रसंगातल्या स्वतःच्या भावनांची कल्पना करणे.

मुलांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकण्याची सवय जडली की बोलण्याच्या या आणि इतर कार्यांमधला फरक लक्षात येऊ लागेल. आणि हेही लक्षात येईल की या कार्यांमध्ये विश्लेषण, कारणमीमांसा यांसारख्या बौद्धिक कौशल्यांचा वापर आणि विकास अंतर्भूत असतो. अशा कौशल्यांचा बोलण्यातून विकास व्हावा असे प्रसंग कसे निर्माण करता येतील याची कल्पना या प्रकरणात पुढे दिलेल्या कृतींवरून येईल.

मुलांच्या बोलण्याचा वर्गातील साधन म्हणून उपयोग करून घ्यायचा असेल तर बोलण्यासाठी पोषक असे वातावरण शिक्षकाने तयार करायला हवे. आपल्या वागण्यामधून आणि मुलांच्या बोलण्याला प्रतिसाद देण्यामधून, मुलांना बोलण्याचे स्वातंत्र्य आहे हे शिक्षकाने मुलांपर्यंत पोचवले पाहिजे. अर्थात याचा अर्थ असा नव्हे की वर्ग म्हणजे मासळीबाजार वाटावा. परिस्थिती बरोब्बर याच्या उलट असायला हवी. आपले ऐकून घेतले जाते, आपले बोलणे शिक्षकाला हवेसे आहे असे प्रत्येकाला वाटायला हवे.

मुलांच्या बोलण्याला प्रोत्साहन देण्यासाठी पाच प्रकारच्या संधी शिक्षक वर्गात निर्माण करू शकतो.

### १. स्वतःविषयी बोलण्याची संधी

बोलण्यासाठी संधी आणि मोकळेपणा असेल, तर सगळ्या मुलांना स्वतःच्या जीवनाविषयी बोलायला आवडते, घडून गेलेल्या गोष्टी आणि पुढे घडणाऱ्या गोष्टींविषयी बोलायला आवडते.

मुलांच्या व्यक्तिगत आयुष्याचा त्यांच्या शिकण्याशी काही संबंध नाही असे काही शिक्षकांना वाटते. अशा शिक्षकांचे म्हणणे असते, की व्यक्तिगत

आयुष्याशी संबंध नसलेल्या गोष्टीच वर्गात बोलल्या गेल्या पाहिजेत, फक्त पाठ्यपुस्तकात चित्रित झालेल्या गोष्टींबद्दलच चर्चा झाली पाहिजे. या आग्रहाला सामोरे जावे लागत असल्यामुळे पुष्कळशी मुले कोणत्याही प्रकारे वर्गात सहभागी होऊ शकत नाहीत. खऱ्या व्यक्तिगत जीवनाशी निगडित नसलेल्या गोष्टींत मुलांना रसच वाटत नाही. आणि पाहुणे म्हणून आलेले नातेवाईक, वादळी पावसामुळे घरात काय झाले, आजारपण वगैरेसारख्या मुलांच्या व्यक्तिगत गोष्टींमध्ये शिक्षकाला स्वारस्य नसते.

अशा परिस्थितीमुळे मुले आणि अभ्यासक्रम यांची पूर्ण फारकत होते. ही फारकत शिक्षक टाळू शकेल, पूर्वी घडलेल्या गोष्टी किंवा मुलांच्या घरच्या जीवनात आत्ता घडणाऱ्या गोष्टी यांच्याबद्दल मुलांना बोलते करण्यासाठी संधी देऊन हे टाळता येईल. या गोष्टींबद्दल बोलण्याची संधी मिळाली तर हळूहळू विविध अनुभवांबद्दलच्या आपल्या भावना, कल्पना मुलांना मांडता येऊ लागतील. सरतेशेवटी शाळेत विज्ञान, भूगोल, नागरिकशास्त्र अशा विविध विषयांतर्गत दिल्या जाणाऱ्या ज्ञानाशी मुलांचा संबंध जुळू शकेल आणि हा संबंध सखोल आणि व्यक्तिगत पातळीवरचा असेल.

### २. शाळेतील वस्तू, प्रसंग याविषयी बोलण्यासाठी संधी

काही निरखण्यासाठी, शोधण्यासाठी शाळेभोवतालची जागा हा एक समृद्ध स्रोतच असतो. शाळा कुठेही असली, तरी तिथे अवतीभोवती शोधाला, चर्चेला भरपूर वाव मिळेल असे साहित्य असतेच. शाळेच्या अवतीभोवती पुढे दिलेल्यापैकी काहीही असू शकेल : दुकाने, झाडे, दगड, रस्ता, कुंपण, माती, फाटक, घरटी, मधमाशांची पोळी, फुले, फुलपाखरे, गटारे, नळ, वगैरे. यापैकी कशाचाही, अगदी कशाचाही वापर अचूक निरीक्षणासाठी करता येतो, खरेपणाचा, वास्तवाचा पडताळा घेण्यासाठी करता येतो, निरीक्षणांची देवघेव करण्यासाठी करता येतो, इतर वस्तूंशी त्याचा काय संबंध आहे हे हुडकण्यासाठी करता येतो.

छोट्या मुलांबरोबर हे सगळे करून बघण्यासाठी 'बोलणे' हे एक उत्तम साधन आहे. मोठ्या औपचारिक सहलीला मुलांना मोठ्या संख्येने नेलेच पाहिजे असे नाही. एका वस्तूबद्दल बोलण्यासाठी तीन-चार जणांच्या छोट्या गटाला नेले तरी ते तितकेच मोलाचे आहे. मोठ्या सहलींना मजा येते आणि ज्या शिक्षकांना ते करणे शक्य आहे त्यांनी ते अवश्य करावे. पण संग्रहालय, पोस्ट ऑफिस अशा ठिकाणी नेणे एखाद्या शिक्षकाला जमण्यासारखे नसेल तर, त्याने शाळेच्या बाहेरच असलेल्या मोडक्या पुलाजवळ किंवा शाळेमागे वाहणाऱ्या सांडपाण्याजवळ तरी मुलांना निरीक्षणासाठी न्यायलाच हवे. सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की फेरफटक्यात काय बघितले ते सांगण्यासाठी, त्याबद्दल बोलण्यासाठी मुलांना मुबलक संधी मिळायला हव्यात.

### ३. चित्रांविषयी बोलणे

सर्जनशील पद्धतीने बोलण्यासाठी किंवा विश्लेषणात्मक पद्धतीने बोलण्यासाठी चित्रे हा मोठाच स्रोत आहे. कुठल्याही प्रकारची चित्रे यासाठी वापरता येतात. रोजच्या वर्तमानपत्रांमध्ये आणि साप्ताहिकांमध्ये जाहिरातींसाठी, बातम्यांसोबत चित्रे छापलेली असतात. कॅलेंडर्स, पोस्टाची तिकिटे, लेबले, भित्तिपत्रके यांच्या रूपानेही चित्रे मिळतात. अगदी लहानशा खेड्यातही यापैकी कोणत्या ना कोणत्या रूपाने चित्रे उपलब्ध होऊ शकतात. अशी चित्रे जमवून शिक्षक चित्रांचा संग्रह करू शकेल, त्यात दर वर्षी भर घालू शकेल.

थोडासा खर्च करणे शक्य असेल तर या साधनांच्या जोडीला चित्रे असलेली गोष्टींची पुस्तके शाळेने जरूर खरेदी करावीत. प्रत्येक भारतीय भाषेत चांगल्यापैकी बालसाहित्य असूनही शिक्षक त्यात विशेष रस घेताना क्वचितच दिसतात. शाळेत जर पुस्तके असतीलच तर ती खराब होऊ नयेत म्हणून कुलपात बंद असतात. मुलांनी चित्रांची/गोष्टींची पुस्तके वापरावीत असे शिक्षकाला वाटत असेल तर पुस्तके नीट कशी हाताळावीत याबाबतची दृष्टी मुलांना द्यायला हवी. पुस्तकांच्या व्यवस्थेत मुलांचाही सहभाग घ्यायला हवा. कोपरा खराब न करता पान कसे उलटावे यासारख्या बारीकसारीक गोष्टींचेही प्रशिक्षण देता येते. अशा बारीक बारीक गोष्टींमधूनच पुस्तकाकडे शिकण्याचे साधन म्हणून आदराने बघण्याची दृष्टी मुलांमध्ये रुजू शकते.

अगदी उत्स्फूर्तपणे, अनौपचारिक पद्धतीने, गटात मुले चित्राबद्दल बोलली तरी ते फलदायी ठरते. मुलांच्या प्रतिसादांच्या विविध पैलूंबाबत जागरूक राहून मुलांच्या भाषेच्या विकासाच्या दृष्टीने असे बोलणे अधिक परिणामकारक होईल असे आपण बघू शकतो. शिक्षकाने विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाने मुलाच्या प्रतिसादाला एक प्रकारचे वळण मिळू शकते. याचा वापर करून, मुलाचा दृष्टिकोन आणि प्रतिसाद यांच्या समृद्धीसाठी आपण प्रश्न विचारू शकू. प्रश्नांच्या मदतीने मुलाला आपण निरनिराळ्या पातळ्यांवर नेऊ शकतो. त्या पातळ्या अशा :

**(अ) शोधणे** : या पातळीवर ''चित्रातल्या गोष्टी शोध'' एवढेच मुलांना सांगायचे. असे प्रश्नही विचारता येतील. 'या चित्रात काय घडते आहे?', 'चित्रात उंदीर आहे का?', 'सायकलवर कोण बसले आहे?', 'मुलाचे वय काय असेल?'.

**(ब) कारण शोधणे** : प्रतिसादाच्या या पातळीवर कारण शोधणे आणि ते लावून बघणे या क्षमतेचा संबंध येतो. चित्रात दिसणाऱ्या विशिष्ट गोष्टींची जी काही कारणे मूल सांगेल, ती शिक्षकाने स्वीकारायला हवीत. अर्थात, नंतर हवे तर शिक्षकाने स्वतःची कारणे द्यावीत. पण फक्त आणखी एक शक्यता म्हणूनच. प्रश्न, उदाहरणार्थ, असे विचारता येतील : - छोटी मुलगी का रडत असेल? - मोटर सायकलची मागची बाजू आपल्याला का दिसत नाही? - उंदीर लपून का बरं बसलाय?

**(क) आरोपण** : या पातळीवर आपण मुलांना चित्राचाच भाग बनायला सांगतो. आपल्याला स्वतःला एखाद्या काल्पनिक प्रसंगात ठेवून कोण काय म्हणेल, कोणाला कसे वाटेल याबद्दल विचार करण्यासाठी मुलांना आपण प्रोत्साहन देतो. उदाहरणादाखल प्रश्न : - या झाडावर बसलास/बसलीस तर तुला कायकाय दिसेल? - छोटी मुलगी सायकलस्वाराला काय म्हणत असेल? - चिटुकल्या उंदराच्या मनात कोणता विचार चालू असेल?

**(ड) अंदाज बांधणे** : या पातळीशी भविष्यातल्या घटनांची अटकळ बांधण्याची क्षमता जोडलेली आहे. यानंतर काय घडेल याबद्दल बोलायला शिक्षकाने मुलांना प्रोत्साहन द्यायचे नुमना प्रश्न : - 'इथून हा माणूस कुठे जाईल?'-'छोटी मुलगी घरी काय करेल?' - 'ती घरी कशी जाईल?'

**(इ) संबंध जोडणे** : या पातळीवर, मुलांनी आपल्या जीवनातल्या एखाद्या गोष्टीचा चित्रात दिसणाऱ्या गोष्टीशी संबंध जोडायचा, उदाहरणादाखल प्रश्न : 'तू कधी मोटरसायकलवर बसला/बसली आहेस का? कसं वाटतं?' 'तुला अनोळखी माणूस कधी भेटला होता का? मग काय झालं?'

**४. गोष्टी ऐकणे आणि त्यांच्याविषयी बोलणे**

गोष्टी ऐकू लागताच आपले मन त्यातल्या प्रसंगांमागे, व्यक्तिरेखांमागे धावू लागते. आपण स्वतःच्या आयुष्यात अनुभवलेले नसतात पण आपण त्याबद्दल कल्पना करू शकतो अशा प्रसंगांबद्दल कितीतरी गोष्टी असतात. त्याचप्रमाणे, त्यातील व्यक्तिरेखांसारखी माणसे आपल्या प्रत्यक्ष जीवनात भेटली नसतील, तरीही त्या व्यक्तिरेखांचे चित्र आपल्या मनात उभे राहते. अशा रीतीने अपरिचित प्रसंग आणि व्यक्तिरेखा जगाच्या आपल्या नकाशाचा भाग बनतात. पुढे, आपल्या जीवनातल्या खऱ्या घटनांप्रमाणेच, या घटनांबद्दलही आपण बोलू शकतो. याच प्रकारे लोक चित्रपट, पुस्तके आणि वर्तमानपत्रातील बहुतेकशा बातम्यांबद्दल चर्चा करीत असतात. सत्यकथा किंवा काल्पनिक प्रसंगावरच्या कथा - दोन्ही प्रकारच्या कथा काहीतरी नवीन असे आपल्या लक्षात आणून देतात. आणि हे 'नवीन काहीतरी' आपल्यात विनासायास, सहज सामावले जाते.

आपण जेव्हा गोष्ट ऐकतो तेव्हा घटनाक्रम आणि व्यक्तिरेखांचे वागणे यांच्या आपल्या मनात उमटणाऱ्या कल्पनांवरून प्रतिसाद देतो. जेव्हा आपण गोष्ट सांगतो, तेव्हा गोष्ट ज्यातून आकार घेते अशा प्रसंगांची फेररचना करीत असतो. अनुभव जर वास्तवातला असेल तर तो जसा घडला, ज्या क्रमाने छोटे प्रसंग घडले, तसाच तो आपल्याला मांडावासा वाटतो. मात्र, जे घडले ते तसेच्या तसे मांडणे कुणालाच शक्य नसते. त्यात थोडेथोडे फेरफार होतातच, कारण त्यातल्या काही बाबी ठळकपणे आपल्याला भिडलेल्या असतात. आपण सांगत असू ती गोष्ट जर वास्तवाबद्दल नसेल, तर आपण तिची रचना करताना जराशी जास्त मोकळीक घेतो. ऐकणाऱ्याला गोष्टीत अधिक रुची

वाटावी म्हणूनही असेल. दोन्ही प्रकारच्या गोष्टींच्या बाबतीत दोन बाबींचा समावेश असतो :

१. जीवन, त्यातले प्रसंग, व्यक्तिरेखा इत्यादींची फेररचना.

२. श्रोत्यांच्या दृष्टीने गोष्ट रंगवणे.

या दोन्ही बाबींकरता भाषेचा संपन्नतेने उपयोग करून घेता यायला हवा. खरोखरच, गोष्ट कोणतीही असो, भाषा आपण सर्जनशील पद्धतीने हाताळू शकलो पाहिजे.

सर्जनशीलतेने भाषा वळवण्या-वाकण्याचे कसब म्हणजे काय हे सांगणारी उदाहरणे, गोष्टी ऐकण्यातून आपल्याला मिळतात. म्हणून गोष्टी सांगणे हा शिक्षकाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचा स्रोत ठरतो.

काही शिक्षकांना असे वाटते, की गोष्टी सांगणे ही कला आहे आणि त्यामुळे फार थोड्या लोकांना गोष्टी सांगायला चांगले जमते. त्यांना असे वाटते ही दुर्दैवाची गोष्ट आहे. कारण त्यामुळे गोष्टी ऐकण्याच्या आनंदापासून मुलांना वंचित रहावे लागते. गोष्ट जर चांगली असेल, तर मुलांना ती ऐकायला आवडतेच. गोष्ट सांगण्याचे कसब पुन्हा-पुन्हा गोष्टी सांगून, सराव करून कमावता येते. मुख्य मुद्दा असा, की चांगल्या गोष्टी निवडून त्या पुन्हा-पुन्हा सांगायच्या. कोणतीच गोष्ट एकदा सांगितली की झाले, असे नाही. चांगल्या गोष्टी पुन्हा-पुन्हा सांगायलाच हव्यात.

गोष्ट सांगून झाल्यावर गोष्टीविषयी बोलणे ही बाब साधीसोपी नाही. अनेक शिक्षकांना गोष्टीचे नैतिक तात्पर्य सांगण्याची घाई असते. गोष्ट सांगून झाली रे झाली, की ते विचारतात, 'गोष्टीतून तुम्ही काय शिकलात?' अर्थपूर्ण चर्चेचा आरंभबिंदू म्हणून या प्रश्नाचे मोल शून्य आहे. गोष्टीला नैतिक तात्पर्य असते, तरीही मुलांना त्यात काहीच रस नसतो. मुलांच्या दृष्टीने गोष्ट हीच महत्त्वाची असते. जो शिक्षक मुलांना तात्पर्य विचारतो, तो गोष्ट सांगण्यातून साधलेल्या सगळ्यावर स्वतःच बोळा फिरवतो. मुलांनी गोष्ट शब्दशः पाठ करावी अशी अपेक्षा करणे हेही तितकेच निरुपयोगी असते. अशा शिक्षकांना वाटते, की मुलांनी गोष्ट जशीच्या तशी पुन्हा सांगावी. मुलांना या अपेक्षेचा अंदाज आला, की गोष्ट ऐकण्यातली मुलांची मजाच हिरावून घेतली जाते. नंतर गोष्ट सांगण्याची अपेक्षा पूर्ण करायची आहे या कल्पनेने त्यांना जराशी भीती वाटू लागते.

गोष्ट ऐकणाऱ्याचे गोष्टीशी नाते जुळायला हवे आणि प्रत्येक मूल आपापल्या पद्धतीने गोष्टीशी बंध जुळवीत असते हे आपण लक्षात घ्यायला हवे. मुलाचे स्वतःचे व्यक्तिमत्व आणि पूर्वानुभव यातून मुलाचा गोष्टीला येणारा प्रतिसाद आकारतो. गोष्टीत केलेल्या वर्णनापेक्षा एखाद्या व्यक्तिरेखेविषयी मुलाला खूपच निराळे काही वाटू शकते. इतर सगळ्या प्रसंगांहून एखादाच प्रसंग त्याला भावनिकदृष्ट्या अर्थपूर्ण वाटू शकतो. स्वतःला योग्य वाटणाऱ्या, अर्थपूर्ण वाटणाऱ्या पद्धतीने गोष्ट आणि त्यातील व्यक्तिरेखांची फेरनिर्मिती करण्याचे स्वातंत्र्य हा प्रत्येक मुलाचा हक्कच आहे. उदाहरणार्थ, मागील प्रकरणातील हत्तीची गोष्ट : एखाद्या मुलाला असे वाटू शकेल, की ती 'शिक्षिका' आहे. कोणत्याही पद्धतीने व्यक्तिरेखा निर्माण करण्याच्या मुलांच्या हक्काची ज्या शिक्षकाला जाणीव असेल, ज्याला हा हक्क रास्त वाटत असेल असा शिक्षक मुलांसाठी अनेक संधी खोलत असतो :- कोणत्याही रीतीने मुलांनी गोष्टीविषयी बोलणे, गोष्ट बदलणे, वाढवणे, व्यक्तिरेखा बदलणे आणि स्वतःच्या गोष्टी रचणे अशा अनेक संधी. गोष्टी सांगितल्या - सांगितल्या लगेचच या संधी मिळाल्या पाहिजेत असे नाही. गोष्टीनंतर अगदी वेगळीच कृती सुरू करणे बऱ्याचदा फायद्याचे ठरते.

**'गोष्टींची बँक'**

सांगण्यासाठी चांगली गोष्ट कुठून शोधायची हे बऱ्याच शिक्षकांना माहीत नसते. गोष्ट म्हणून वर्तमानपत्रांतले, मासिकांतले गोष्टीसारखे असणारे लेख वाचून दाखवून ते स्वतःची आणि मुलांची समजूत घालतात.

शिक्षकाने स्वतःसाठी गोष्टी संकलित करून पन्नास साठ गोष्टींची 'बँक' बनवणे आणि त्या लक्षात ठेवणे ही काही फारशी कठीण गोष्ट नव्हे. अशा संग्रहासाठी अनेक मार्गांनी गोष्टी मिळू शकतील.

- पंचतंत्र, कथासरित्सागर, महाभारत, विक्रमादित्याच्या गोष्टी, पुराणकथा इत्यादींमधून.
- भारतातल्या प्रांतोप्रांतीच्या लोककथा, तसेच जगभरातल्या लोककथांमधून.
- तुमच्या स्वतःच्या भागातील लोककथांमधून, समाजातील वयस्क लोकांच्या मदतीने अशा कथा जमविता येतील.
- ऐतिहासिक कथांमधून
- गोष्ट म्हणून सांगता येण्याजोग्या स्थानिक पातळीवरच्या घटना.

**५. अभिनयातून सादर करणे**

गोष्टी आणि नाटक यांचा खूप जवळचा संबंध आहे, आणि बऱ्याचदा, शिक्षक यशस्वीरीत्या एकातून दुसऱ्यात शिरू शकतो. मनापासून गोष्ट ऐकणारे मूल अलगदपणे गोष्टीतल्या भूमिकांमध्ये शिरते. नाटकात अगदी हेच घडते, फक्त अधिक नेमकेपणाने आणि उघडपणाने घडते. बोलणे, अभिनय आणि हालचाल यांच्याद्वारे वेगवेगळ्या भूमिका करण्याची संधी मुलांना नाटकातून मिळते. गोष्ट ऐकताना श्रोत्याला जसे करावे लागते, तसेच नाटकात मुलांना करावे लागते : म्हणजे - आपण कुणीतरी वेगळे आहो अशी कल्पना करणे, त्याच्या दृष्टिकोनातून बघणे वगैरे. फरक एवढाच की नाटकात दुसऱ्या कुणाच्यातरी दृष्टीने बघणे अधिक सक्रियपणे करावे लागते. काल्पनिक प्रसंग, काल्पनिक व्यक्ती यांना साजेसे शब्द, हावभाव तेव्हा शोधावे लागतात. अधिक चांगले बदल करायला खूप वाव असतो, नाटक हा 'बोलण्याचा' पुढचा टप्पा कसा हे त्यातूनच नेमके समजते.

दुर्दैवाने, शाळांमध्ये नाट्याच्या नावाखाली जे घडते, त्यात दुरुस्त्या करण्यासाठी अवकाशच नसतो. मुलांना ठराविक भूमिका दिल्या जातात, पाठ करण्यासाठी संवाद दिले जातात. विशेष प्रसंग म्हणून नाटकाचा वापर होतो, मुलांच्या भाषेच्या वापराच्या विस्ताराच्या दृष्टीने नव्हे. फार थोडी मुले मुख्य कार्यक्रमाच्या फेरीपर्यंत पोहोचतात. आपले चुकले की काय याची भीती प्रत्येकालाच वाटत असते. त्यामुळे मोकळेपणा, मजा या गोष्टी अभावानेच आढळतात. भाषिक कृती म्हणून नाटकाचा वापर करायचा असेल, तर मोकळीक आणि मजा अत्यावश्यक आहेत.

नाटक ही गोष्ट मुलांना फार वेगळी किंवा परकी असते असे अजिबात नाही, हे भाषा शिकवताना नाटकाचा वापर करणाऱ्या शिक्षकाला पक्के माहीत असायला हवे. नाटक हा मुलांच्या रोजच्या जीवनाचा भाग असतो! नक्कल करणे, जरा वाढवूनच सांगणे, थोडेसे ढोंग करणे या नाटकातल्या युक्त्या मुले सदासर्वकाळ वापरीतच असतात. परंपरेने चालत आलेले मुलांचे खेळ आणि कृती यांचा नाटक हा नेहमीच अपरिहार्य भाग राहिलेला आहे. ज्याला नाटकातली कौशल्ये अवगतच नाहीत असे मूल सापडणे अवघड आहे. परंतु वर्गात ही कौशल्ये वापरायला बरीच मुले तयार होणार नाहीत. त्यांना वाटेल, वर्ग ही काही खेळण्याची जागा नव्हे. येथेच खरे शिक्षकाने काम करायला हवे. वर्गात खेळता येईल असे वातावरण शिक्षकाने निर्माण करायला हवे. वर्गात खेळण्यात गैर काही नाही असे मुलांना त्या वातावरणातून वाटू लागेल. अर्थातच 'असे वातावरण तयार करण्यासाठी हे तंत्र वापरा' असे सांगता येणार नाही. मुलांच्या उत्स्फूर्त बोलण्याला प्रोत्साहन देण्यातून, मुलांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकण्यातून, हळुवार होऊन हळूहळू असे वातावरण निर्माण करता येते.

दुसरी गोष्ट म्हणजे प्रेक्षकांसमोर सादर केले जाणारे नाटक आणि रोजच्या वापरासाठी असलेले नाटक यात फरक आहे. आपण सध्या दुसऱ्या प्रकाराबद्दल बोलतो आहोत. या प्रकारात आधी लिहिलेले संवाद, नेपथ्य, सराव, प्रकाशयोजना वगैरेंना स्थान नाही. अभिनयातून सादर करण्यासाठी कुठल्याही प्रसंगाचे लहानसे वर्णन पुरेसे आहे. नाट्यगुण असलेली वर्णने बहुतेकदा मुलांच्या बोलण्यातूनच पुढे येतात. मात्र त्याकरता, जे दिसले, जे वाटले त्याविषयी मुलांनी मोकळेपणाने बोलायला हवे. बस कशी थांबली, लोक कसे उतरले, काही लोक चढले मग बस पुन्हा सुरू झाली, बसमध्ये आत काय-काय घडते आहे हा प्रसंग वर्गातल्या सगळ्याच्या सगळ्या, अगदी चाळीस मुलांनी सादर करण्यासाठी उत्तम प्रसंग आहे. शिक्षकाने सांगितलेल्या, वाचून दाखवलेल्या गोष्टी हेही नाटकांसाठी उत्तम साहित्य ठरते.

गोष्टीत जर अगदी मोजक्या व्यक्तिरेखा असतील, तर पाच-पाच मुलांच्या लहान गटांनी नाटुकली सादर करावीत. किंवा वेगवेगळ्या गोष्टी सादर कराव्यात. गटागटांमध्ये स्पर्धा लावण्यात काहीही अर्थ नाही. त्यातून फक्त शिक्षकावरचे अवलंबित्व वाढते, अनावश्यक ताणही वाढतो.

उत्स्फूर्तपणे अभिनय करून काही सादर करण्याची सुरुवात जर लहान वयातच झाली, तर वाचनकौशल्यांचा विकास होण्यासाठी पक्का पाया तयार होतो. नाटक आणि वाचन यामध्ये अगदी थेट नसला तरी दुवा आहे. शब्द आणि शरीराच्या हालचाली (उदा. वाकणे, हावभाव, इ.) यांचा प्रतिके म्हणून जाणीवपूर्वक वापर करण्याची निःसंदिग्ध संधी नाटकातून मिळते.

गोष्ट सांगण्याबरोबरच नाट्यमय कृतीमधून मूल प्रतिकात्मक अर्थाने जगात सहभागी होते. (म्हणजे, प्रत्यक्ष आपला संबंध नसलेल्या प्रसंगातही सहभाग घेते.) चांगले वाचक बनण्यासाठीही हीच क्षमता असावी लागते - प्रत्यक्षात डोळ्यासमोर नसलेल्या गोष्टी डोळ्यासमोर आणण्याची आणि जणू काही त्या प्रत्यक्षातच असल्याप्रमाणे त्यांना प्रतिसाद देण्याची क्षमता.

**शिक्षकाचा प्रतिसाद**

मुले शाळेत प्रवेश घेतात त्या सुमारास मातृभाषेतील मूलभूत रचनांवर बहुतेकांनी, विस्मय वाटावा एवढे प्रभुत्व मिळवलेले असते. देवघेवीच्या अनेक प्रसंगी भाषा कशी वापरायची हे तर मुले जाणतातच, शिवाय प्रसंगानुरूप, संदर्भानुरूप भाषा कशी बदलायची हेही मुले जाणतात. श्रोता म्हणून ऐकलेल्या संदेशाचे कृतीत रूपांतर करणे पाच वर्षांच्या मुलांना जमते. (उदाहरणार्थ : सांगितल्यावर पाण्याचा पेला घेऊन येणे आणि तो जागेवर ठेवणे) एवढेच नाही, तर बोलण्यावरून माणसांची व्यक्तिमत्वे, त्यांचे परस्परांशी असणारे संबंध याविषयीचे अचूक आडाखेही मुले बांधू शकतात. या सगळ्या क्षमता आपल्या दिनक्रमातून मुले आपली आपण कमावतात, त्यांना कोणी शिकवत असे नाही. जे जे काही मुलाच्या भोवताली घडते ते ते सर्व काही मुलाच्या अवधानाच्या चाळणीतून जातेच आणि मुलाच्या भाषाविश्वाचा भाग बनते.

मुलाने या क्षमता कमावल्या, त्याबद्दल शिक्षक म्हणून आपल्याला आदर वाटायला हवा. अगदी पूर्णपणे नव्याने आपण शिकवावे, असे जवळजवळ काहीच नसते. मुलाजवळ असलेल्याच क्षमता आणखी वाढाव्या याकरता योग्य अशी परिस्थिती तेवढी आपण निर्माण करू शकतो.

बोलण्याच्या संदर्भात अशी परिस्थिती निर्माण करायची, तर मुलाच्या बोलण्याला आपण काय प्रतिसाद देतो, याबद्दल आपण जागरूक आणि सावध असायला हवे. जेव्हा जेव्हा आपण मुलाचे ऐकू आणि प्रतिसाद देऊ तेव्हा या गोष्टी पाळायला हव्यात :

१. मुलाला पूर्णपणे बोलू द्या.

२. मुलाला जे सांगायचे आहे त्यात रस घ्या.

३. त्याचे बोलणे खोडून काढण्याच्या आपल्या इच्छेवर मात करा.

४. फक्त 'छान', 'वा!' किंवा 'असं नाही' असे न म्हणता, मुलाने जे म्हटले असेल, ते अधिक तपशील भरून, अधिक चांगली वाक्यरचना करून म्हणा.

उदाहरणार्थ, मूल जर म्हणले असेल, 'झाडावरची खार' तर शिक्षकाचा प्रतिसाद असा काहीसा असू शकेल : 'खार झाडावर चढताना दिसली तुला?'

५. अधिक माहिती विचारा, त्याच विषयाची एखादी नवी बाजू मुलाला दाखवा.

या पद्धतीने मुलांशी बोलायचे असेल, तर चांगल्यापैकी सराव हवा. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बोलणे हे शिकण्यासाठी एक महत्त्वाचे स्रोत-साधन आहे याविषयीची जाणीव असायला हवी. आणि बोलण्यातून मुलाच्या सामाजिक वर्तनाला, व्यक्तिमत्वाला आकार येत असतो, हे ध्यानात ठेवायला हवे.

अगदीच गप्प बसणारी मुले शिक्षकांसाठी विशेष अडचणीची ठरू शकतात. काही मुलांना बोलण्यापेक्षा खेळण्यात, वस्तू बनवण्यात जास्त रस असू शकतो. मात्र, प्रतिसाद देणे, प्रश्न विचारणे, आपण काय करतो आहोत हे इतरांना सांगणे यापैकी काहीही करण्याची एखाद्याला इच्छाच नसेल, तर त्या मुलाकडे विशेष लक्ष देणे अगत्याचे ठरते. घरी विविध प्रकारे त्याच्या बोलण्याच्या

उत्साहावर बोळा फिरवला गेला असण्याची, बोलणे दाबले गेले असण्याची शक्यता आहे. मुलाचा अबोलपणा ही त्याच्या व्यक्तिमत्वाच्या इतरांच्या संदर्भातली, आत्मप्रतिमेच्या झालेल्या नुकसानाची प्रकट झालेली केवळ एक बाजू असू शकेल. घरच्या दडपणाऱ्या वातावरणाचा परिणाम मोठा असतो, परंतु त्यात बदल करणे अशक्य मुळीच नसते. खरा संवेदनशील शिक्षक नेमक्या अवघड जागा हेरतो आणि लहानग्या मुलाच्या, जगाशी असणाऱ्या संबंधात आश्चर्यकारक बदल घडवून आणतो.

**काही कृती**

अगदी साध्यासुध्या वर्गात कोणीही शिक्षक घेऊ शकेल अशा अगणित कृतींपैकी या काही कृती आहेत. दरवेळी कृती देताना थोडासा जरी बदल केला तरी आधीच्यापेक्षा अधिक उत्साहाने मुले ती कृती करतील.त्यामुळे, प्रत्येक वेळी जराशी नवी भर घालून प्रत्येक कृती कितीदाही देता येईल. केलेल्या फेरफारांची रीतसर नोंद ठेवा, म्हणजे तुम्ही नवीन काय केलेत हे तुमच्या अननुभवी सहकाऱ्यालाही दाखवता येईल. पुढे वर्णन केलेल्या प्रत्येकच कृतीत जरासे बदल करून विविधता आणता येईल, त्यातूनच निराळ्या कृती निर्माण होतील.

**१ : तुला काय दिसलं?**

पहिली पायरी : एका मुलाला वर्गाबाहेर पाठवावे. काय दिसते आहे हे पाहून येऊन ते त्याने वर्गाला सांगावे.

उदाहरणार्थ : तो सांगू शकेल की एक ट्रक, दोन दुकानं आणि एक सायकल दिसली.

दुसरी पायरी : आता बाकीच्या मुलांनी शक्यतो गोलात बसावे आणि आळीपाळीने त्याला एकेक प्रश्न विचारावे.

उदाहरणार्थ : कुणीतरी विचारले, 'सायकलच्या हँडलला काय लावलं होतं?' याचे उत्तर असू शकेल, 'बास्केट' मग पुढचा प्रश्न कदाचित असेल, 'बास्केटचा रंग कोणता होता?'

तिसरी पायरी : प्रश्नांची पहिली फेरी संपली, की बाहेर जाऊन आलेल्या मुलाला शिक्षक विचारतील, 'सगळ्यात चांगला प्रश्न कुणी विचारला?' समजा तो म्हणाला, 'शशीनं', तर शिक्षक विचारतील, 'शशीचा प्रश्न कोणता होता बरं?'

चौथी पायरी : पुढची फेरी शशीपासून सुरू होईल. आधीच्या मुलाला जे दिसलेले नाही, असे काहीतरी शशीला पाहायला सांगावे. ती परत आली, की मुलांनी तिला नवीन प्रश्न विचारावेत. आधी विचारलेले प्रश्न पुन्हा विचारायचे नाहीत.

**२ : पाहणीकर्त्यांना प्रश्न विचारणं**

शाळेच्या आवारातील किंवा शाळेजवळचीच एखादी जागा किंवा वस्तू यांची पाहणी करण्यासाठी पाच-सात मुलांच्या लहानशा गटाला पाठवावे. उदाहरणार्थ, त्यांना झाडांची, चहाच्या टपरीची, मोडक्या पुलाची किंवा एखाद्या घरट्याची पाहणी करायला सांगता येईल. जे जे दिसेल त्याचे काळजीपूर्वक/ बारकाईने निरीक्षण करा, त्यावर बोला असे त्यांना सांगावे.

जेव्हा हा गट पाहणी करायला जाईल, तेव्हा वर्गातल्या बाकीच्यांना त्या ठरलेल्या जागेबद्दलचे तपशील सांगावेत. उदा. चहाची टपरी बघायला मुले गेली, तर बाकीच्या मुलांना टपरीत काय काय मिळते, टपरी कोण चालवते, तिथे मिळणाऱ्या वस्तू कुठून आणल्या जातात इत्यादीबद्दल आपण सांगावे.

'पाहणीकर्ते' वर्गात परतले की वर्गाच्या प्रश्नांना त्यांनी तोंड द्यावे. शिक्षकही प्रश्न विचारण्यात सहभागी होतील. पुढच्या वेळी दुसऱ्या गटाला पाठवावे.

**३ : ओळखा पाहू, मला काय दिसलं!**

एकाने वर्गाबाहेर जावे, दाराशी थांबावे किंवा वर्गापासून थोड्या अंतरावर जावे. आसपास दिसणाऱ्या शेकडो गोष्टींमधून एक काहीतरी निवडावे. ते काहीही असू शकेल. झाड, पान, खार, पक्षी, तारा, खांब, गवत, दगड.... परत आल्यावर मुलाने निवडलेल्या गोष्टीविषयी फक्त एक वाक्य सांगावे. उदाहरणार्थ, 'मला जे दिसले ते तपकिरी आहे.'

निवडलेल्या गोष्टीविषयी वर्गातल्या प्रत्येक मुलाने एक प्रश्न विचारावा. प्रश्न असे असू शकतील:

पहिले मूल : ते बारीक आहे का?

उत्तर : नाही.

दुसरे मूल : ते किती मोठं आहे?

उत्तर : बऱ्यापैकी.

तिसरे मूल : ते खुर्चीएवढं मोठं आहे का?

उत्तर : नाही, खुर्चीहून लहान आहे.

चौथे मूल : ते फिरू शकतं का?....

अखेरीस, जेव्हा मनातली गोष्ट ओळखली जाईल तेव्हा काही मुले काही उत्तरांबद्दल आक्षेप घेऊ शकतील. उदाहरणार्थ : कुणीतरी असे लक्षात आणून देईल की रंग तपकिरी नाही, तर मातकट आहे. अशा वेळी शिक्षकाची भूमिका फार महत्त्वाची ठरते. कारण अर्थच्छटांमधल्या फरकांचे बारकावे शिक्षक मुलांच्या लक्षात आणून देऊ शकतात.

**४ : सांगितल्याप्रमाणे करणे**

तुम्ही काय सांगता आहात ते मुलांना लक्षपूर्वक ऐकायला सांगा. सुरुवातीला साध्या गोष्टी सांगा आणि संपूर्ण वर्गाला त्यानुसार कृती करू द्या.

उदाहरणार्थ, "हात डोक्याला लावा"

"उजवा डोळा झाका"

"डोक्यावर थापट्या मारा"

वर्गाचे दोन गट करा. एका गटाला शिक्षकाने सूचना द्याव्या. तशाच स्वरूपाच्या सूचना या गटाने दुसऱ्या गटाला द्याव्या. सूचनांची काठिण्यपातळी वाढवत न्यावी. उदाहरणार्थ, 'दोन्ही हात डोक्याला लावा आणि नंतर उजव्या कानाला उजवा हात लावा.' 'दोन्ही डोळे मिटा. शेजारच्याला हात लावा आणि त्याला डाव्या हाताने तुमच्याशी हस्तांदोलन करायला सांगा.'

**५ : तुलना करणे**

दोन किंवा जास्त झाडांची पाने, वेगवेगळी फुले, दगड, वेगवेगळ्या आकारांचे कागदाचे तुकडे अशा साधर्म्य असलेल्या वस्तूंचे संच करा. यापैकी एखाद्या संचातील एका वस्तूचे वर्णन तुम्ही करा. मुलांनी ऐकून वर्णन केलेली वस्तू हुडकून काढावी. उदाहरणार्थ, 'माझ्या मनात एक पान आहे. ते मऊ आणि सरळ आहे आणि त्याच्या कडा सरळ आहेत.'

थोडावेळ ही कृती केली की मग मुलांनी आळीपाळीने वस्तू निवडून त्यांचे वर्णन करावे. प्रत्येक वेळी ही कृती करताना वस्तू बदलाव्यात. प्रत्येक वेळी अधिक बारकाईने वैशिष्ट्ये हेरावीत.

**६ : कसे बनवले?**

कागद, कापड किंवा उपलब्ध असलेले अन्य कोणतेही साहित्य वापरून मुलांना वस्तू बनवायला शिकवा. कागदी होडी, हातबाहुली, तोरण... काहीही करत असताना आपण काय करत आहोत याचे तपशीलवार वर्णन करा. मुलांच्या हातात जरूर ते साहित्य देऊन तुमच्या मागोमाग त्यांनाही वस्तू करू द्या. उदाहरणार्थ, कागदी होडी कशी बनवायची हे दाखवताना प्रत्येक पायरीचे वर्णन करा. 'कागदाच्या मधोमध घडी घाला. आता आणखी एकदा घडी घाला.तीन पदर एका बाजूला करा. एक पदर एका बाजूला घ्या...'

मुलांना जेव्हा ती वस्तू करता यायला लागेल तेव्हा त्यांना ती कशी केली या प्रक्रियेचे वर्णन करायला सांगा. पुढच्या खेपेस, गटागटांना वेगवेगळ्या वस्तू करायला द्या आणि आपण वस्तू कशी बनवली ते एकेका गटाला इतरांना सांगू द्या.

**७ : अभिनय – खेळ**

पहिली पायरी : मुलांच्या रोजच्या पाहण्यातल्या दहा – पंधरा क्रिया निवडा.

उदाहरणार्थ, केर काढणे, केळी सोलणे, ताटल्या धुणे, भाजी चिरणे, दोन भरलेल्या बादल्या घेऊन चालणे. प्रत्येक मुलासाठी कोणती क्रिया निवडली आहे हे त्याच्या/तिच्या कानात सांगा. मग प्रत्येक मुलाला पुढे येऊ द्या आणि ती क्रिया करून दाखवू द्या. कोणती क्रिया केली हे मुलांना ओळखू द्या.

दुसरी पायरी : कृतीची काठिण्यपातळी वाढवा. चारपाचजण लागतील अशी क्रिया निवडा. गट करा आणि प्रत्येक गटाला समूहाने कृती करू द्या. ज्यांना वाचता येते, त्या जरा मोठ्या मुलांना काय करायचे ते कागदाच्या चिठ्ठ्यांवर लिहून द्या.

### ८ : चित्राचे विश्लेषण

पाचपाचजणांचे गट करा. प्रत्येक गटाला एकेक चित्र द्या. कृती सुरू होण्यापूर्वी तुम्ही चित्र काळजीपूर्वक बघा आणि प्रतिसादांच्या पातळीनुसार प्रश्न तयार करा. (प्रतिसादांच्या पातळीसाठी याच प्रकरणातील 'बोलण्यासाठी पाच प्रकारच्या संधी' हा भाग पहा. चित्रांविषयी बोलणे या तिसऱ्या संधीबाबतच्या विवेचनात या पातळ्यांचा उल्लेख आहे.) अशा प्रकारे शिक्षक प्रत्येक गटाला पाच प्रश्न देईल.

चित्राचे निरीक्षण करण्यासाठी आणि त्याबद्दल आपसात बोलण्यासाठी मुलांना पाच मिनिटे द्या. मुलांना एक ते पाच क्रमांक द्या. आणि तुम्ही काढलेले प्रश्न त्यांना विचारा.

अनौपचारिकरीत्या एकेकाशी गप्पा मारण्यासाठीही या प्रश्नांचा उपयोग होऊ शकेल. जेव्हा चार आठ वेळा तुम्ही ही कृती घ्याल तेव्हा तुमच्या लक्षात येईल की प्रश्न सुचणे तसे सोपे आहे, मात्र सुरुवातीला प्रश्नांचीही पूर्वतयारी करणे चांगले.

### ९ : नेमके चित्र ओळखणे

मुलांसाठीची पुस्तके, विशेषतः सचित्र पुस्तके भरपूर असतील तरच ही कृती घेता येते. मुलांच्या जोड्या करा. त्यांना समोरासमोर ओळीत बसवा. एक ओळ पुस्तके पाहून, त्यातल्या चित्रांपैकी एक चित्र निवडेल. या ओळीत बसलेले प्रत्येक मूल निवडलेल्या चित्राचे वर्णन समोरच्याला सांगेल. वर्णन करून झाले की ऐकणाऱ्याला पुस्तक दिले जाईल. ते मूल त्यातून वर्णनाबरहुकूम चित्र शोधून काढेल.

दोन्ही ओळी पुस्तकांची देवघेव करतील आणि कृती पुढे चालू राहील. भिंतीवर चित्रे लावून ही कृती जराशा निराळ्या ढंगाने घेता येईल.

### १० : गोष्ट रचणे

वस्तूंची झाकणे, चिंध्या, बांगड्यांच्या काचा, टूथपेस्टच्या रिकाम्या ट्युबा, छोटे दगड, पाने, निबे वगैरे चित्रविचित्र गोष्टी जमवा. यापैकी पाच-सहा गोष्टीचे गठ्ठे करा. आणि पाच-पाच, सहा-सहा मुलांच्या गटात ते वाटा. प्रत्येक गट बसण्याजोगी जागा शोधून बसेल आणि गठ्ठ्यातल्या गोष्टींबद्दल बोलेल. पंधरा ते वीस मिनिटांत गोष्ट तयार करायची असा याचा उद्देश आहे. सगळे गट वर्गात आले की प्रत्येक गटातील एकजण गोष्ट सांगेल. ठरल्याप्रमाणे गोष्ट नेमकी सांगितली जात नाही असे गटातले इतरजण म्हणाले, तर बदलांचे स्वागत करा.

तुमच्या मुलांना गोष्ट ऐकण्याची किती सवय आहे. यावर या कृतीचे यश अवलंबून आहे आणि गोष्ट रचण्याची त्यांना कितपत सवय आहे यावरही. कोणताही साधासा अनुभव गोष्ट म्हणून रंगवून सांगता येतो. तसेच, एखादी साधीशी वस्तू वर्णनाचा आरंभबिंदू ठरू शकते. शिक्षक म्हणून तुमच्यात ही कल्पकता असेल तर तुमची मुले हे सहज आत्मसात करतील.

### ११ : तू कुठे राहतोस?

दोन ओळी करून एकमेकांकडे तोंड करून मुले बसतील. एक ओळ सांगणाऱ्यांची, दुसरी ओळ ऐकणाऱ्यांची. घरी कसे जायचे हे प्रत्येक 'सांगणाऱ्याने' 'ऐकणाऱ्याना' समजावून सांगायचे. ऐकणाऱ्यांनी कितीही प्रश्न विचारून ते नेमके समजून घ्यायला हरकत नाही.

सांगणारा - 'सरळ जा आणि वळ'
ऐकणारा - 'सरळ कुठपर्यंत जाऊ?'
सांगणारा - 'कचराकुंडीपर्यंत जा आणि वळ'
ऐकणारा - 'उजवीकडे वळू की डावीकडे?'
सांगणारा - 'उजवीकडे.... अं.... बघू बघू....'

नंतर ऐकणारे सांगतील, सांगणारे ऐकतील खेळ पुन्हा सुरू होईल.

### यातून साध्य काय होईल?

जगाला भिडताना भाषेचा वापर कसा करायचा याची क्षमता मुलांमध्ये वाढावी असा या सगळ्या कृतींमागचा हेतू आहे. त्यामुळे 'बोलणे' हे क्षेत्र जेव्हा आपण निवडतो. तेव्हा आपण खरे तर त्याचा संबंध मुलांच्या विकासाच्या व्यापक अंगाशी जोडत असतो. या व्यापक भागात बऱ्याच गोष्टींचा समावेश असतो. नवीन माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारण्याची क्षमता, मर्यादित

माहितीच्या आधारे उत्तम आडाखे बांधणे, परिचिततेच्या एकाच एका पातळीच्या पलिकडे जाऊन वस्तूकडे बघणे आणि सर्जक पद्धतीने अर्थ लावणे. काही कृतींमधून मुलाला दोन माध्यमांमधे वावरण्याची संधी मिळते. उदाहरणार्थ, शब्द आणि चित्रे. अशा संधीतून अमूर्त आणि स्पष्ट प्रतिकांची सांगड घालण्याच्या क्षमतेचा पाया घातला जातो. मुलाचा वाचक म्हणून विकास होण्यामध्ये याचा भरघोस वाटा असतो.

या कृती किंवा या धर्तीवरच्या स्वतः तुम्ही आखलेल्या कृतीचा लेखन - वाचनाबाबतच्या पुढील दोन प्रकरणांत आलेल्या कृतींशी अनेक प्रकारे संबंध दिसून येतो.

भाषेच्या कक्षेचा विस्तार तर या अधिक गुंतागुंतीच्या कौशल्यांद्वारे होतोच, शिवाय बोलणे हे जीवनभरासाठी जगाशी भिडण्याचे एक मूलभूत साधन असल्यामुळे वाचायला-लिहायला यायला लागल्यानंतरही मुलांबरोबर बोलण्याबाबतच्या कृती चालूच ठेवायला हव्यात.

◆ ◆ ◆

# प्रकरण ३

# वाचन



लहान मुलांच्या शिक्षकांपुढच्या आव्हानांपैकी सगळ्यात मोठे आव्हान म्हणजे वाचायला शिकवणे. मुलांना 'वाचते' करणे अतिशय कठीण आणि तितकेच रोमांचक आहे. ते सर्वात कठीण आहे कारण वाचन हे काही साधेसुधे कौशल्य नाही. बोधाच्या पातळीवरील अनेक क्षमता आणि इतरही अनेक कौशल्ये यांची सांगड घालणे वाचनक्षमतेमध्ये अंतर्भूत आहे. वाचायला कसे शिकवायचे याची एकच एक सर्वसमावेशक अशी पद्धती नाही. प्रत्येक पद्धतीच्या काही ना काही मर्यादा आहेत. आणि एखाद्या विशिष्ट परिस्थितीत नेमके काय करायला हवे हे कुणीच सांगू शकत नाही. तरीही वाचायला शिकणे ही हरखून टाकणारी गोष्ट आहे. त्याचे कारण म्हणजे 'वाचते होण्यावर' मुलांच्या जीवनातले खूप काही अवलंबून असते. आणि एकदा का मुलाची वाचन आणि पुस्तके यांच्याशी ओळख झाली, की मूल काय काय करू शकेल या बाबतच्या शक्यता खूपच वाढतात.

म्हणून मुलाला यशस्वीरीत्या वाचायला कसे शिकवता येईल ही मुद्द्याची गोष्ट ठरते. या संदर्भात आपल्या भोवती दिसणाऱ्या प्रचंड अपयशाबाबत आपण क्षणभर विचार करायला हवा. कोट्यवधी मुले दरवर्षी वाचायला शिकतात आणि त्यापैकी कित्येक मुलांचे वाचनकौशल्य टिकाऊ स्वरूपाचे नसते. 'टिकाऊ' प्रकारचे वाचनकौशल्य आत्मसात करण्यात ती अपयशीच ठरतात. कसेबसे वाचून शाळेची परीक्षा पास होणे बऱ्याच जणांना जमते, मात्र त्यांना वाचनाची गोडी अजिबात लागत नाही. बरीच मुले 'बरे' वाचताना दिसतात. पण त्यांना त्यातले फारच थोडे समजलेले असते. वाचन शिकवण्यातला कच्चेपणाच या सगळ्याला प्रामुख्याने जबाबदार असतो.

मुलाच्या एकंदर विकासात निकोप वाचन-कौशल्याचे स्थान काय असते हे शिक्षकांना पुन्हा सांगण्याची जरूर नाही. मात्र, निकोप वाचनकौशल्ये म्हणजे काय आणि त्यांचा विकास कसा होतो याबाबतची नेमकी जाण फार थोड्या शिक्षकांना असल्याचे आढळते. या प्रकरणात आपण वाचनाकडे विशिष्ट पद्धतीने पाहणार आहोत. त्यानुसार, ज्यांच्याद्वारे मूल लिखित किंवा छापील भाषेशी अर्थाची सांगड घालू शकेल अशी कौशल्ये म्हणजे निकोप 'वाचन-कौशल्ये'. वाचलेल्याचा अर्थ जोपर्यंत मूल लावू शकत नाही, किंवा आधीच ठाऊक असलेल्या कशाशी तरी मूल वाचलेल्याचा संबंध लावीत नाही, तोपर्यंत मुलाचे वाचन निकोप आहे असे आपण म्हणू शकणार नाही. म्हणून आपल्या कामाच्या संदर्भात 'लिहिलेल्या शब्दांमधील अर्थ गवसण्याची प्रक्रिया' अशी आपण वाचनाची व्याख्या करू.

**वास्तव असे आहे**

या व्याख्येला अनुसरून काम करण्याचे एकदा आपण स्वीकारले की बालवाड्यांमध्ये आणि प्राथमिक शाळांमध्ये नित्यनेमाने घडणाऱ्या अनेक गोष्टी आपल्याला असमाधानकारक वाटू लागतील. उदाहरणार्थ, बाराखड्यांची घोकंपट्टी किंवा शब्दशः पाठ केलेली गोष्ट सर्वांनी मिळून सांगणे या गोष्टी वाचनाच्या आपल्या व्याख्येनुसार योग्य ठरणार नाहीत. कारण अशा घोकंपट्टीतून अर्थ आणि लिहिलेले शब्द यांची सांगड मुलांच्या मनात घातली जात नाही. वर्णमालेतल्या, बाराखडीतल्या सुट्या सुट्या एकेका अक्षराला काहीच अर्थ नसतो. गोष्टीतले शब्द जर एकेक सुटे वाचले तर त्यातून फारच थोडासा अर्थ गवसतो आणि मग गोष्टीशी नाते असे जुळत नाही.

अशा कृतींचा लगेच उपयोग झालेला दिसतोच असे नाही, परंतु पुढील काळातील अर्थपूर्ण वाचनाचा पाया त्यातून घातला जातो असे काहीजण म्हणतील. कदाचित या विधानात थोडे तथ्य असेलही. मात्र, अर्थपूर्ण वाचनाचा टप्पा गाठेपर्यंत सर्व मुले शाळेत टिकली तरच त्यात तथ्य आहे असे म्हणता येईल. पण दहादा तेच ते अक्षर उच्चारणे, गिरवणे, सुटे सुटे शब्द पुन्हा पुन्हा म्हणणे यामधील तोच तोचपणा अनुभवाला आल्यामुळे निराशेच्या गर्तेत जाणाऱ्या मुलांचे काय?

ज्यातून लगेच काहीतरी मिळते अशा गोष्टी करायला मुलांना आवडते हे आपण सगळे जाणतो. ज्यामुळे बऱ्याच काळानंतर काहीतरी मिळेल अशा गोष्टींमध्ये रस घेणारी, त्यात मजा वाटणारी मुले फार थोडी असतात. आणि कित्येक मुलांच्या बाबतीत पुढे शाळेत राहण्याचे भाग्यही दुर्मिळच. इतर अनेक घटकांच्या जोडीला आरंभीच्याच काळात येणारी निराशा आणि अपयश यामुळे मुले शाळा सोडतात.

यामुळे 'वाचन शिकवण्याची सुरुवात अर्थपूर्ण कशी होईल?' हा आपल्यापुढचा कळीचा प्रश्न होय. शिक्षक करू शकतील अशा काही गोष्टी पुढे दिल्या आहेत. ज्यांना पारंपरिक पद्धतींची सवय आहे, त्यांना या गोष्टींमुळे एकदम चक्रावून गेल्यासारखे वाटेल, त्या अशक्य वाटू शकतील. परंतु जुन्या पद्धती पुरेशा प्रभावी असत्या, तर नव्यांची गरजच भासली नसती. जुन्या पद्धतींमधून हाती काहीच लागत नसल्यामुळे, आपल्याला नव्या पद्धतींची जरूर आहे. फक्त नव्या पद्धतींचीच नव्हे तर संपूर्णपणे नव्या दृष्टिकोणाची गरज आहे.

### पुस्तकांनीच सुरुवात

फ्लॅश कार्डस, तक्ते, लाकडी अक्षरे यांनी सुरुवात करण्यापेक्षा पुस्तकांनीच सुरुवात करणे महत्त्वाचे आहे. कारण, 'मुलांना पुस्तके वाचता यायला हवीत' हे आपले अंतिम उद्दिष्ट. पुस्तकांना पूरक म्हणून पत्ते, तक्ते इत्यादी साहित्याचा वापर उपयुक्त ठरेलही, पण आपण पुस्तक वाचू शकतो यातून मिळणारे समाधान तक्ते किंवा पत्ते यांच्या वाचनावरील प्रभुत्वामधून मिळत नाही.

पुस्तके कुठल्या प्रकारची आणि त्यांचे नेमके काय करायचे हे प्रथम आपण स्पष्ट करून घेऊ या. मागच्या प्रकरणात बोलण्याच्या संदर्भात ज्यांच्याविषयी उल्लेख केला आहे, तीच पुस्तके वाचायला शिकवतानाही पायाभूत ठरतात.

बालसाहित्यातील वीसेक पुस्तके तुम्ही जमवू शकलात, तर ते नवीन पद्धतीने वाचन शिकवण्यासाठी पुरेसे आहे. तुम्ही विकत घेतलेल्या वीस पुस्तकांच्या जोडीला तुम्ही स्वतः काही पुस्तके बनवू शकता. सोबत मुलांनी काढलेली चित्रे आणि रेखाटने असलेली आणि सुवाच्य अक्षरात लिहिलेली कोणतीही गोष्ट पुस्तकांच्या संग्रहात कायमची भर चालू शकेल. तसेच मुलांच्या तोंडी असणारी गाणी, कविता, बडबडगीते यांचाही संग्रह करता येईल.

### मुलांना पुस्तक वाचून दाखवणे

ऐकणाऱ्या मुलांच्या गटात दहाहून अधिकजण नसावेत. ऐकायला मुले तुमच्याभोवती जमिनीवर बसलेली असावीत. एक गट ऐकत असेल त्यावेळी वर्गातल्या इतर मुलांना काहीतरी काम दिलेले असायला हवे. तुमच्या भोवती बसलेल्यांपैकी प्रत्येक मुलाला तुम्ही वाचत असलेले पुस्तक दिसायला हवे. तुम्ही पाने उलटत आहात हेही मुलांना दिसले पाहिजे. फक्त पुस्तकातले तसेच आणि तेवढेच वाचणे पुरेसे नाही. तुमच्या स्वतःच्या भाषेत त्याचे रूपांतर व्हायला हवे. काही वेळा पुस्तकातल्या गोष्टी खूप तपशीलवार असतात, किंवा पुस्तकांमध्ये कशाची तरी माहिती बारकाव्यांसह दिलेली असते. एखादी मोठी गोष्ट नुसती मोठ्याने वाचून दाखवून भागणार नाही. गोष्ट तुम्हाला माहीत असायला हवी. म्हणजे तुमच्या शब्दात तुम्ही ती लहान करू शकाल. त्याचप्रमाणे, प्रत्येक पानावर लिहिलेला मजकूर एखाद्दोन ओळींचाच असेल तर भर घालून त्यात तुम्ही रंगत आणू शकाल. चित्रातल्या तपशिलांकडे लक्ष वेधणे, त्याविषयी अगदी सहजपणे बोलणे विशेष महत्त्वाचे आहे.

अशा प्रकारे पुस्तक वाचून दाखवल्यावर प्रश्न विचारून किंवा अन्य मार्गांनी मुलांची परीक्षा घेणे योग्य नाही. गोष्ट झाली, की झाले! मग मुलांना आपणहून काही बोलावेसे, विचारावेसे वाटले नाही, तर पुढच्या कृतीकडे वळायचे. वाचनाच्या अशा प्रसंगी 'तुम्ही प्रश्न विचारणे' बाजूलाच ठेवायला हवे.

अशा प्रकारे पुस्तकातून वाचून दाखवलेले प्रत्येक मुलाला जर आठवड्यातून किमान तीनदा ऐकायला मिळाले तर मुले तुम्ही वाचून दाखवलेल्या पुस्तकांबद्दल बोलायला लागतील. तुम्हाला किंवा मुलांना वाटेल तितक्या वेळा एखादे पुस्तक पुन्हा पुन्हा जरूर वाचा. चित्रांना आणि गोष्टीला मुले लवकरच इतकी सरावतील की तुम्ही काय वाचणार याचा अंदाज त्यांना

आधीच यायला लागेल. अशा प्रकारचे आडाखे बांधू शकण्यातूनच पुढे मुले स्वतःहून पुस्तक वाचण्यास प्रवृत्त होतील. पुस्तक कशाबद्दल आहे, पुस्तकात काय आहे हे त्यांना तोपर्यंत चांगलेच माहीत झालेले असेल. आणि त्या सगळ्याशी विविध प्रकारे त्यांचे नाते जुळलेले असेल. शब्दातील प्रत्येक अक्षर किंवा पानावरचा प्रत्येक शब्द जरी मुले वाचू शकली नाहीत, तरी पुस्तक वाचताना, अर्थाच्या आणि साहचर्याच्या पातळीवर मुले पुस्तकांशी जोडली जातील.

**वाचन म्हणजे काय?**

ज्यांना वाचता येत नाही, अशांसाठी वाचन म्हणजे एक गूढच आहे. सुमारे वीसेक वर्षांपूर्वीपर्यंत तज्ज्ञांनाही ते नेमके ठाऊक नव्हते. मूल वाचायला शिकते तेव्हा नेमके काय घडते हे तज्ज्ञ सांगू शकत नव्हते. रूढी-परंपरेच्या आणि आपल्या अनुभवाच्या आधाराने शिक्षकांनी काही पद्धती पाडल्या : मूळाक्षर-पद्धत, बाराखडी-पद्धत, 'पहा आणि म्हणा' पद्धत वगैरे. भाषेतला कोणता भाग कोणत्या पद्धतीत पहिल्या टप्प्यावर वाचायला दिला जातो त्यानुसार पद्धतींना नावे दिली गेली. यापैकी कोणतीही पद्धत वाचनप्रक्रियेच्या ज्ञानावर आधारित नव्हती. तरीही, या पद्धती आजतागायत लोकप्रिय ठरल्या आहेत.

लिपिबद्ध केलेल्या माहितीचा गोषवारा चटकन आत्मसात करणे वाचनात अंतर्भूत असते हे आता ज्ञात झाले आहे. अक्षरांचे आकार, विरामचिन्हे, अक्षरांची शब्दांतील जुळणी आणि शब्दांमधील मोकळी जागा यावरून आपली नजर फिरते, तेव्हा कागदावर उमटलेल्या प्रत्येक न् प्रत्येक तपशिलाची हाताळणी आपल्याला करावी लागत नाही. तसे असते तर, माहितीच्या छोट्या छोट्या कणांवर प्रक्रिया करण्याची आपली कुवत ओझ्याखाली पार दबून गेली असती. एवढेच नव्हे तर आपण ज्या वेगाने नेहमी व्यवहार करतो, ते अशक्यच होऊन बसले असते. पारंपरिक ढाच्याने वाचायला शिकणाऱ्या बऱ्याच मुलांच्या बाबतीत नेमके हेच घडते. ती मुले प्रत्येक शब्दाचे छोटे छोटे तुकडे पाडतात आणि त्यामुळे शब्दाचा अर्थ लावण्याच्या प्रक्रियेवर फार जास्त ताण येतो. कुशल वाचक असा ताण येऊ देत नाही. मजकुरात उपलब्ध असलेल्या चित्रित माहितीपैकी निवडक अशी मर्यादितच माहिती कुशल वाचक ग्रहण करतो. अक्षराच्या संपूर्ण आकृतीकडे तसेच शब्दांमधील प्रत्येक अक्षराकडे किंवा वाक्यातील प्रत्येक शब्दाकडे तो बारकाईने लक्ष देत बसत नाही. तो जेव्हा वाचतो तेव्हा लिपीद्वारा चित्रित केलेल्या तपशिलांच्या काही भागाकडेच तो लक्ष देतो. आणि अक्षरांचे वळण, शब्द, त्यांचे अर्थ, त्यांच्या जुळणीच्या रीती याबाबतच्या अनुभवांवर आणि एकंदर जगाबाबतच्या आपल्या अनुभवावर आधारित अशी अटकळ बांधून, हुशारीने अंदाज करून बाकीचे तपशील त्यात भरतो.

वाचन ही काही एखादी सुटी अधांतरी घडणारी गोष्ट नव्हे. भाषा ज्यांची बनलेली असते अशा तीनही प्रकारच्या सूचकांवर वाचताना एकाच वेळी प्रक्रिया करावी लागते. ती तीन प्रकारची सूचके म्हणजे :

(१) अक्षरांची वळणे व आकार आणि त्यांच्याशी संलग्न असलेले उच्चार (ध्वनि-अक्षर संबंधदर्शक सूचके (graphophonemic clues)

(२) शब्दक्रमाशी संबंधित सूचके (syntactic clues) उदा., विशेषणानंतर नाम येते.

(३) शब्दांच्या अर्थाशी संबंधित सूचके (semantic clues)

सहजधर्म म्हणून भाषा वापरत असताना या तीनही प्रकारच्या सूचकांबाबतचे काही अंदाज आणि अपेक्षा आपल्या मनात तयार होत जातात. हे अंदाज, या अपेक्षा आपल्याला मोठीच मदत करतात, लिपीद्वारा चित्रित केलेल्या चिन्हांमधून वेगाने फिरताना आपल्या नजरेने जे उचलले नाहीत, ते तपशील चातुर्यपूर्ण आडाखे बांधून भरून काढण्याचे काम करण्यासाठी त्या मदत करतात.

**कविता म्हणणे**

'वाचन म्हणजे काय?' हा उतारा वाचल्यावर तुमच्या ध्यानात येईल की योग्य पद्धतीने आडाखे बांधणे आणि काहीएक अपेक्षा करणे या कौशल्यांचे

स्थान वाचनाच्या प्रक्रियेत कळीचे ठरते. या कौशल्यांच्या विकासाला कविता मोठाच हातभार लावू शकतात. नेमाने कविता ऐकून ऐकून मुलांची भाषेतल्या मूलभूत रचनांशी ओळख होते. कवितांबाबत सर्वात उपयुक्त काय ठरत असेल, तर त्या सहज लक्षात राहतात. कविता तोंडपाठ करायला लहान मुलांना विशेष असे कष्ट पडतच नाहीत. पुन्हा पुन्हा म्हणण्यातून आणि ऐकण्यातून, कविता, मुलांकडे आधीच असलेल्या साठ्याचा कायमचा भाग बनून जातात.

चांगल्या कवितांची निवड कोठून आणि कशी करायची हा शिक्षकाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न होय. पाठ्यपुस्तकांमध्ये असलेल्या कवितांचा दर्जा बेतासबातच असतो. त्यामुळे भाषाविकासाच्या दृष्टीने त्यांचे मोल फारसे नसते. त्याचप्रमाणे नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या कवितांचा दर्जाही उत्तम असतोच असे नाही. पाठ्यपुस्तकांतील किंवा मासिकांमधील कविता बोधप्रद आणि ज़राशा कंटाळवाण्याच असतात. त्यांची रचना आणि त्यांतले शब्द कृत्रिम वाटतात. दैनंदिन व्यवहारातल्या भाषेचा बाज अशा कवितांमध्ये उतरलेला दिसत नाही. त्यामुळे भाषाशिक्षणात त्यांचे मोल काडीचेही नसते.

मुलांच्या वाचनकौशल्यांची पायाभरणी करण्यासाठी अगदी वेगळ्याच प्रकारच्या कविता हव्यात. पुढे अशा काही कविता दिल्या आहेत. अशा कविता सर्व भारतीय भाषांमध्ये खात्रीने असतीलच. फक्त त्यांचा कसोशीने शोध घ्यावा लागेल. भाषेला खेळवत, त्यात नैसर्गिक रीतीने भाषेचा वापर केला आहे ना, याकडे डोळसपणे पहावे लागेल. आणि अर्थातच केवळ शैक्षणिक कविता पूर्णपणे बाजूला ठेवाव्या लागतील.



१

**एवढा मोठा भोपळा**
**आकाराने वाटोळा**
**लांबोळी सापोळी**
**पडवळाची वेटोळी**
**कोबी फ्लॉवरचा नखरा**
**मटाराचा तोरा**
**नाजुक साजुक भेंडी**
**वांग्याला शेंडी**
**टोमॅटो कांदा बटाटा**
**सर्व भाज्या करती ''टाटा''**

२

एक होत्या आजीबाई
स्वयंपाकाची त्यांना घाई
पंगत बसली मुलांची
रांगोळी काढली फुलांची
मुलांना लागली फारच भूक
भाकरी भाकरी लवकर फुग
आजी भाजी वाढ वाढ
ताकावरचं लोणी काढ काढ
ताकावरचं लोणी काढलं
भाकरीवरती वाढलं
भाजी केली मेथीची
कोशिंबीर केली काकडीची
चटणी केली खोबऱ्याची
उसळ केली मटकीची
मटकीला आले मोडच मोड
आजीचा स्वयंपाक फारच गोड

३

किती दिसते ही कपिला गोजिरवाणी
मी देतो चारापाणी
किती मऊ मऊ हे अंग लागते हाता
मारीना कोणा लाथा
ही शिंगे सुंदर दोन
हे मोठे मोठे कान
शेपटी किती ही छान
जरि काळी ही, दूध पांढरे देई
लागते गोड ते ताई!

**– ग. म. वैद्य**

४

एक दोन तीन चार
राने झाली हिरवीगार
पाच सहा सात आठ
तळे भरले काठोकाठ
नऊ दहा अकरा बारा
मंद मंद वाहे वारा
तेरा चौदा पंधरा सोळा
कमळे डुलती तुम्ही डुला
सतरा अठरा एकोणीस वीस
वाऱ्यावरून आलं पीस
पीस आहे मोराचं मोराचं
रान पिकलं बोराचं बोराचं
ओंजळ भरली बोरांनी बोरांनी
गंमत केली पोरांनी पोरांनी

५

कुंभकर्णाला झोप आली
डोंगर घेतलान् उशाखाली
वादळांनी त्याला घातला वारा
तरी घामाच्या सुटल्या धारा
त्यातून निघाले नदीनाले
किती लोक बुडून मेले
रावणाने डागली नाकात तोफ
तेव्हा उडाली त्याची झोप
कुंभकर्ण म्हणाला, ''बहार झाली!
स्वप्नात पुन्हा झोपच आली!''

**– विंदा करंदीकर**

६

अबबब बबबब केवढा फणस आई
आजोबांचं पोटसुद्धा एवढं मोठं नाही
अबबब बबबब काटे खालून-वरून
एक दोन तीन चार अंकच गेले सरून
अबबब बबबब फोडणार कसा याला
डिंक डिंक डिंक डिंक
सगळाच डिंक झाला
अबबब बबबब कोण सबंध खाई
आजोबांच्या पोटाएवढं त्याचं पोट होई

**–विंदा करंदीकर**

७

हसून हसून
दुखले पोट
तर वर घाला
गरम कोट

  हसून हसून
  दुखले अंग
  तर वर घाला
  हुप्प्या हिंग

हसून हसून
दुखले डोळे
तर वर ठेवा
बर्फ गोळे

  हसून हसून
  दुखले गाल
  तर वर ठेवा
  बर्फाची साल

हसून हसून
दुखला घसा
तर वर थोडे
आणखी हसा

**– अनंत भावे**

८

एका देवमाशाने
गिळली बोट
डोंगराएवढे
झाले पोट

  देवमासा गेला
  डॉक्टराच्या घरी
  म्हणाला, ''पोटात
  ढाराढुरी.''

डॉक्टरने कापले
त्याचे पोट
आणि काढली
बाहेर बोट

  मग डॉक्टर
  हसला मिशीत
  देवमासासुद्धा
  आला खुशीत

आणि म्हणाला
घालीत कोट
''फी साठी
ठेवा बोट.''

**– विंदा करंदीकर**

९

झुळकेसरशी वारं येतं
केसांच्या बटा उडवून जातं!
पावसात भिजून वारं आलं
गारेगार करून गेलं!
गुलाबी अत्तर वाऱ्यानं लावलं
खुषीत येऊन घरभर धावलं.
वाऱ्यानं धरला गोल गोल फेर
घरात झाला केरच केर!
वाऱ्याची गिरकी वर वर गेली
वाळलेली पानं उडवून नेली!
वाऱ्याच्या अशा हजार खोड्या
काही शहाण्या काही वेड्या.
वारं माझ्याशी करतं मस्ती
त्याची माझी जिवाची दोस्ती.
मला एकदा रडू आलं
वारं डोळे पुसून गेलं!

– **शांता शेळके**

कुणीही शिक्षक अगदी सहज करू शकेल अशी गोष्ट म्हणजे काही गाणी लिहून काढणे. चेंडू खेळताना, दोरीच्या उड्या मारताना मुले जी गाणी गातात ती गाणी. अशी पारंपरिक गाणी शहरात सापडणे अवघड जाईल, पण थोडा प्रयत्न केला तर ती जमवता येतील. या संग्रहातून पुढे एक पुस्तक किंवा अनेक लहानशी पुस्तके तयार होऊ शकतील. प्रत्येक पानावर एक कविता आणि शेजारी त्या कवितेला साजेसे चित्र. कवितेच्या आशयाचे हुबेहूब प्रतिबिंब काटेकोरपणे चित्रात असायला हवे असे मुळीच नाही. कवितेतला भाव त्या चित्रातूनही जागा व्हायला हवा. कवितेतल्या प्रतिमांशी साधारणपणे जुळणारे चित्र असले तरी पुरे. अशा प्रकारे तुम्ही स्वतःच साधारणपणे सोळा सोळा पानांची पुस्तके बनवू शकाल. जाडसर कागद नाही मिळाला, तर साधा पांढरा कागद वापरूनही ही पुस्तके बनवता येतील. जाडसर कागद वापरला तर पुस्तके जास्त टिकतील. आणि दरवर्षी परत परत तयार करावी लागणार नाहीत.

मुलांसमोर इतर पुस्तके वाचली तेव्हाप्रमाणेच कवितावाचन करतानाही मुलांच्या मध्ये बसून आपण हातात पुस्तक धरलेले असायला हवे. दोन चार वेळा असे वाचल्यानंतर पुस्तक न घेता मोठ्याने कविता म्हणावी आणि मुलांना सोबत म्हणायला सांगावी. कविता जर चांगल्या दर्जाची असेल तर मुलांच्या चटकन लक्षात राहील. पुढच्या वेळी तुम्ही पुस्तकातून ती कविता वाचून दाखवाल त्यावेळी पुढे कोणता शब्द असेल याची मुले अटकळ बांधतील. सहा वर्षे वयाची मुले लहानशी कविता पाटीवर किंवा सुट्या कागदावर आनंदाने उतरवून काढतील. तोपर्यंत कविता पाठ झालेली असेल तर थोड्याच दिवसात ती सुटे शब्द ओळखू लागतील.

**पुस्तके बनवणे आणि ती वाचणे**

शाळेत पुस्तके असणे पुरेसे नाही. पुस्तके वर्गातही असायला हवीत. या दोन्हीचाही उपयोग होतो. मात्र पुस्तके बनवण्याला हा पर्याय ठरत नाही.

एकेका मुलासाठी किंवा सर्वांसाठी शिक्षकाने बनवलेले वाचनसाहित्य हे सर्वात उत्तम साहित्य होय. गोष्टी सांगणे किंवा वाचून दाखवणे, चित्रांविषयी बोलणे, कविता म्हणणे याविषयी आतापर्यंत विवेचन केले आहे. शिक्षकाने बनवण्याच्या साहित्याचा उगम त्यातूनच होऊ शकतो. कागद कोणता वापरायचा हे उपलब्धतेनुसार ठरू शकेल. मुलांकडे जर वह्या असतील तर त्यांची पुस्तके बनू शकतील. शिक्षक किंवा शाळा यांना सुटे कागद, जरा जाडसर कार्डशीट किंवा ड्रॉइंगपेपर विकत घेणे शक्य असेल तर अधिकच चांगले.

साधारणपणे वयाच्या पाचव्या वर्षाच्या आसपास वाचनाची सुरुवात करावी. मात्र हे लक्षात ठेवायला हवे, की एकाच वर्गातली सर्व मुले एकाच वेळी वाचू लागतील असे नाही. वाचायला शिकण्याचा त्यांचा वेग एकसारखा नसतो.

मुलामुलांमधले हे वैविध्य अगदी ठळकपणे दिसते. कुणामधे पाचव्या वर्षीच ही ओढ आणि क्षमता दिसून येईल आणि सातव्या वर्षापर्यंत वाचनाची कौशल्ये त्यांनी आत्मसातही केलेली दिसतील. मात्र कुणाकुणाला आठव्या वर्षापर्यंत अडचणी येत राहतील. मुलांशी सतत संपर्कात असलेल्या शिक्षकाला मुलांमधील अशा फरकांमुळे चिंता वाटायचे कारण नाही. प्रत्येक मूल कसे कसे पुढे जात आहे, मुलांना कोणकोणत्या अडचणी येतात यावर शिक्षकाचा विचार मात्र चालू राहायला हवा. हे एक आव्हानच आहे. मुलांची संख्या फारच जास्त असेल तर मात्र हे करणे शक्य होणार नाही. अशा वेळी या सर्व गोष्टी एका मर्यादेपर्यंत करता येतील.

चित्रे, गोष्टी आणि कविता वापरून केलेल्या विविध कृतींमधून जे बोलणे झाले, त्यातील एखादे वाक्य किंवा शब्द एकेका कागदासाठी निवडा. ज्या गोष्टीवरून, चित्रावरून बोलणे सुरू झाले त्या गोष्टीची किंवा चित्राची आठवण त्या शब्दातून वा वाक्यातून व्हायला हवी. मुलांना तो शब्द किंवा ते वाक्य अर्थपूर्ण वाटेल याबाबत आपण निःशंक राहू शकू. प्रत्येक मुलासाठी लिहिलेल मोठ्याने वाचून दाखवा. नंतर मुलाला सांगा ''हे पाहून असंच खाली लिही.'' किंवा ''यावरून गिरव.'' रोज मुलांसाठी नवा शब्द लिहिला की आधीच्या शब्दांची आणि वाक्यांची उजळणी घ्या. मुलाला वाचता नाही आले, तर वाचून दाखवा. नवीन वाक्ये लिहायला रोज तुम्ही बसाल तेव्हा आधीची वाक्ये ऐकल्यावर त्यासंबंधी जास्त काहीतरी बोलले जायला हवे. उदाहरणार्थ, आधीचे वाक्य कुत्र्याबद्दलचे असेल तर त्याच्याबद्दल एक-दोन प्रश्न विचारा, किंवा काहीतरी बोला. लहानसहान चुका केल्या तर त्या दुरूस्त करू नका. 'ये' ऐवजी 'या' वाचले तर अर्थाचा घोटाळा होत नाही, तेव्हा अशा चुका दुरूस्त करू नका.

हळूहळू वर्गातली प्रत्येक वही ही विविध कल्पनांचे आणि गोष्टींचे पुस्तकच बनून जाईल. तुमच्या शब्दाखालचे मुलाच्या अक्षरातले शब्द पाहताना लक्षात येईल, की मुलाच्या दृष्टीने काही अक्षरांचे वळण सोपे तर काहींचे कठीण असते. काही अक्षरे, चिन्हे यांच्यासाठी सरावाची गरज असते. जरूर वाटेल तितक्या वेळा असा सराव त्याच पानावर करायला काहीच हरकत नाही. तुमच्या भाषेतले प्रत्येक अक्षर मुलाने ओळखायला हवे आणि सर्व अक्षरे त्याला सराईतपणे लिहिता यायला हवीत, हे आपले अंतिम उद्दिष्ट!

इंग्रजी मुळाक्षरांहून मराठी मुळाक्षरे अगदी वेगळी आहेत असे काही लोकांना वाटते. त्यांनी तुम्हाला ते सांगितलेही असेल. त्यांना वाटते की बाराखडीच्या खुणा स्वतंत्रपणेच शिकवायला हव्यात. बाराखडीचिन्हविरहित असेच शब्द मुलांनी वाचायला हवेत असेही त्यांना वाटते. (जसे, सरबत, वर, करवत इ.) हे मत काही एका गृहीतकावर आधारित आहे आणि सर्वांना ते मान्य असायला हवे असे अजिबात नाही. बाराखडीची चिन्हे हा मराठीच्या देवनागरी लिपीचा अंगभूत असा भाग आहे. अर्थपूर्ण मजकुराच्या वाचनाचे कौशल्य आत्मसात करीत असताना, मुलांनी बाराखडी चिन्हांनाही सुरुवातीपासूनच सामोरे का जाऊ नये? बाराखडीचिन्हे असलेले शब्दही मुलांच्या वाचनात सुरुवातीपासून असायलाच हवेत. लेखनासाठी उपयोगी ठरावे म्हणून बाराखडी-चिन्हांचा नंतर सराव देणे, ती घटवून घेणे हा मुद्दाच निराळा आहे.

**अर्थ आणि उच्चार**

सुट्या, एकेका अक्षराने सुरुवात न करता, अर्थपूर्ण अशा शब्दांनी, वाक्यांनी किंवा गोष्टींनी सुरुवात करणे फार महत्त्वाचे आहे. मुलांची नजर मजकुराला सरावली, त्याचा अर्थ काय हे त्यांना माहीत झाले की मगच शब्दाच्या घटकांकडे, म्हणजे अक्षरांकडे त्यांचे लक्ष वेधणे योग्य होय. काही शब्द किंवा एखाद्या साध्या गोष्टीतील छोटी वाक्ये यांच्याशी मुले प्रथम परिचित व्हायला हवीत. त्यानंतर प्रत्येक शब्दात आलेल्या अक्षरांकडे त्यांचे लक्ष वेधता येते. तसेच कोणत्या आवाजासाठी किंवा उच्चारासाठी कोणते अक्षर याकडेही मुलांचे लक्ष वेधता येते. 'नजर शब्दांना सरावणे' म्हणजे संपूर्ण शब्दाची आकृती हीच एक 'चित्र' असल्याप्रमाणे त्याकडे पाहणे आणि तो शब्द अशा प्रकारे 'पाहून ओळखणे.' अक्षरओळख नसतानाही अशा प्रकारे पुष्कळ शब्द नजरेने पाहून मुले ओळखू शकतात. आणि ते जमू लागले की भावी वाचनासाठीचा आत्मविश्वास आणि वाचनासाठीची प्रेरणा, आश्चर्य वाटेल इतके उंचावलेले दिसतात. शब्द

ओळखू यायला लागल्यानंतर, एकेका शब्दात आलेली अक्षरे कोणती आणि त्यांचे उच्चार काय हे मुले शिकू शकतात.

पाहून ओळखता येणाऱ्या सगळ्या शब्दांची अशी अक्षरात फोड करून झाली, की मुले एका टप्प्यावर पोचतात. या टप्प्यावर, 'शब्दांकडून अक्षरांपर्यंत' आणि 'अक्षरांमधून शब्दांकडे' या दोन्ही प्रक्रियांचा एकत्रित वापर करण्याची क्षमता त्यांच्यात आलेली असते. आणि ती क्षमता वापरून मुले साधा सोपा मजकूर आपआपला वाचू शकतात.

वाचण्यासाठी किती संधी मिळते, कितीदा संधी मिळते आणि वाचनाची गोडी मुलांना लागावी यासाठी शिक्षक कशा प्रकारचे वातावरण निर्माण करतो यावर यानंतरची प्रगती अवलंबून राहते.

**सुरुवात तर झाली**

येथे सुचवलेल्या कृतींवरून आणखी कितीतरी नवीन कृती घेता येतील. त्यासाठी नवनवीन साहित्यही बनवून वापरता येईल. अशा रीतीने वाचायला शिकलेल्या मुलांना कुठलाही मजकूर वाचण्याजोगा वाटतो, हे शिक्षक म्हणून

तुमच्या लवकरच लक्षात येईल. प्रत्येक वाक्याची एक पट्टी याप्रमाणे एखाद्या छोट्या परिच्छेदाचा कागद कापला तर ती वाक्ये जुळविण्याचे कोडे मुले सोडवू शकतील. हे कोडे सोडवताना जी कौशल्ये मुलांना वापरावी लागतील, त्यातून उत्तम वाचकासाठी जरूर असणाऱ्या क्षमताच जोपासल्या जातील. त्या क्षमता अशा : उत्तम प्रकारे अंदाज बांधणे, मजकुराचा आशय समजून घेणे आणि स्वतःच्या अंदाजाची योग्यायोग्यता ताडून बघणे.

एकदा का मुलाला वाचता यायला लागले, की वेगवेगळ्या उद्देशांनी मूल 'वाचते' राहिले पाहिजे ही जबाबदारी शिक्षकाची. विविध हेतूंनी मुलांना वाचायला मिळेल अशी संधी देणाऱ्या प्राथमिक शाळा अभावानेच आढळतात. फक्त पाठ्यपुस्तके आणि परीक्षा यातच वाचन अडकून राहते. नवीन माहिती मिळावी याकरता वाचन, आपल्या आवडीच्या विषयाबाबतचे वाचन आणि निर्मळ आनंदासाठी वाचन यांची सरळसरळ उपेक्षा होते. व्यक्ती म्हणून मुलाच्या एकंदर वाढीचा 'वाचन' हा एक भाग बनायला हवा; तसा तो बनत नाही. परिणामतः ज्याला वाचता येते ते मूलही पुढे चांगला वाचक बनत नाही. हे तर फारच मोठे अपयश आहे, मात्र कोणीही शिक्षक ते पालटू शकेल.


**१. जमिनीचा नकाशा**

तुमच्या वर्गात काही फर्निचर नसेल तर चांगलेच. नाहीतर, जिथे इकडेतिकडे हिंडण्याजोगी मोकळी जागा आहे अशा ठिकाणी मुलांना न्या. उदाहरणार्थ : पडवी, मागचे अंगण इ.

पळणे, चालणे, उड्या, दोरीवरच्या उड्या, ढांगा टाकत धावणे, जोरात धावणे, दुडक्या चालीने चालणे, उलटे चालणे, बाजूला चालणे या सगळ्या कृतींसाठी चिन्हे ठरवा. चिन्हे सहज लक्षात राहतील इतकी सोपी हवीत.

उदाहरणार्थ : धावणे, दोरीवरच्या उड्या

वेगवेगळ्या जागी ती चिन्हे काढून ठेवा. मुले जर पहिल्यांदाच हा खेळ



खेळत असतील तर तीन ते चार चिन्हे पुरेत. नाहीतर मुले गोंधळतील.

कोणत्याही ठिकाणापासून सुरुवात करा. मुलांनी तिथे जायचे आणि चिन्हाने सूचित केलेली कृती करायची. प्रत्येकाला दोनदा-चारदा कृती करायला मिळाली की चिन्हांच्या जागी कृतीचा शब्द लिहून ठेवा. हळूहळू चिन्हांची संख्या वाढवा.

वर्गात परत आल्यावर त्यांना त्या जागेचा नकाशा काढायला सांगा. कोठे काय केले हेही काढायला सांगा.

**२. मुळाक्षरांची विभागणी**

कागदाच्या चार पट्ट्यांवर थोडी थोडी मुळाक्षरे याप्रमाणे सर्व मुळाक्षरे लिहा. एका कागदी पट्टीवर बाराखडीची चिन्हे लिहा. सगळ्या पट्ट्या मध्ये थोडे थोडे अंतर सोडून मुलांसमोर भिंतीला लावा.

आता फळ्यावर एक शब्द लिहा. या शब्दातली अक्षरे आणि बाराखडीच्या खुणा मुलांना बारकाईने पाहायला सांगा. पट्ट्यांवर लिहिलेल्या अक्षरांमधून शब्दातल्यासारखी अक्षरे व खुणा मुलांना दाखवायला सांगा.

**३. विज्ञान-वाचन**

काही निकष ठरवून घ्या. त्या निकषांत बसणाऱ्या वस्तूंची नावे मुले सांगतील. उदाहरणार्थ 'उडणाऱ्या वस्तु', 'गोल वस्तू' 'चपट्या वस्तू' 'पोहणाऱ्या वस्तू'.निकष फळ्यावर लिहा. वाचून दाखवा. मग निकषात बसणाऱ्या वस्तू आठवून मुलांनी सांगायच्या. उदाहरणार्थ उडणाऱ्या वस्तूंसाठी मुले सांगतील, ''पतंग, विमान, पक्षी, ढग''.फळ्यावरची यादी पाहून मुले ते शब्द पाटीवर/वहीत लिहीतील. त्या त्या शब्दाला साजेसे छोटे चित्रही शेजारी काढायला सांगा.

**४. शब्दांचे ठिकरीपाणी**

जमिनीवर चौकटी काढून घ्या. परिचित वस्तूंची नावे त्यात लिहा. (उदा. पेला, चमचा, घर, झाड इ.) त्या त्या वस्तूसाठी छोटीशी खूण नावाशेजारी काढा. पाच-पाच मुलांचे गट करा. प्रत्येक गटात एका मुलाला पंच करा. पंचाने ठिकरी टाकायची. ती ज्या घरात जाईल त्यात लिहिलेला शब्द सोडून बाकी सर्व घरातले शब्द वाचत तेथून लंगडी घालत प्रत्येकाने जायचे. गटातील सगळ्यांनी पंचाचे काम करायचे. चौकटींमध्ये निरनिराळी अक्षरेही लिहिता येतील.

**५. वाचून तसे करणे**

ज्या मुलांना वाचता यायला लागते, त्यांना हेही समजायला हवे की वाचनाचा संबंध काहीतरी करण्याशी असतो.

शिक्षकाने फळ्याशी शांतपणे उभे रहावे. बोलून सूचना द्यायच्या ऐवजी एकेक छोटी सूचना फळ्यावर लिहावी आणि एकेका मुलाला पुढे बोलावून तसे करायला सांगावे.

सगळ्या मुलांनी १, २, ३... असे क्रमांक घ्यावेत. सूचना लिहून झाली की त्या शेजारी एक क्रमांकही लिहा. त्या क्रमांकाच्या मुलाने त्या सूचनेनुसार कृती करायची. उदा. ''ऊठ. एक दगड आण-१०'' म्हणजे १० नंबरच्या मुलाने जाऊन दगड आणायचा. पुढची सूचना अशीही लिहिता येईल ''१० नंबर कडून दगड मागून घे आणि तुझ्या उजव्या मांडीवर ठेव - ५''.

हळूहळू थोड्या गुंतागुंतीच्या सूचनाही देता येतील. उदा. वर्गात फलकावर लावलेल्या चित्रामधला एखादा बारकावा दाखवणे, दवाखान्याचा रस्ता सांगणे, बाहेरची झाडे मोजणे वगैरे.

**६. आधीचा शब्द, नंतरचा शब्द**

या कृतीसाठी मुलांची बरीच पुस्तके लागतील.

सहज वाचता येतील अशी पुस्तके मुलांना वाटा. प्रत्येकाला एक पुस्तक मिळायला हवे. पुस्तकाचे कोणतेही पान काढून उजवीकडच्या पानावर बघायचे. शेवटी पूर्णविराम असेल तर नवीन पान उघडायचे.

उजवे पान मुलांनी शांतपणे वाचायचे. आता पुढचे पान पाहायचे नाही. पुढच्या पानावरचा पहिला शब्द काय असेल याचा अंदाज मुलाने करायचा. अंदाज बरोबर आला तर टाळ्या वाजवायच्या !

आता पुढचे पान वाचायला घ्यायचे. पान उलटल्यावर मागच्या पानावरचा शेवटचा शब्द काय असेल हे आठवून मुलाने सांगायचे.

## ७. तीन प्रश्न

दोन ओळीत अमोरासमोर मुलांना बसवा. जोडीतल्या एकाकडे पुस्तक द्या. त्यातले एक पान एकाने मनात वाचायचे. जोडीतल्या दुसऱ्याने नंतर तेच पान मनात वाचायचे. मग पहिल्याने दुसऱ्याला त्यावर कोणतेही तीन प्रश्न विचारायचे. दुसऱ्याने उत्तरे द्यायची. मग दुसऱ्याने प्रश्न विचारायचे, पहिल्याने उत्तरे द्यायची.

सुरुवातीला मुलांना नेमके काय विचारावे हे कदाचित ठरवता येणार नाही. प्रश्न कसे विचारायचे याची उदाहरणे द्यावी लागतील. वाचलेल्या मजकुरावर प्रश्न तयार करण्याचा सराव देता येईल.

## ८. कवितांची सरमिसळ

ही कृती थोडी गुंतागुंतीची आहे. म्हणून तयारी नीट आणि पुरेशी आधी करून ठेवायला हवी. एकदा तयारी केली की ते साहित्य पुन्हा पुन्हा वापरता येईल. आणि किती मजा येते ते तुम्हाला समजेल.

चार चार ओळींच्या बऱ्याच कविता निवडा. शक्यतो यमक जुळणाऱ्या कविता घ्या. समजा २० मुलांसाठी ही कृती घ्यायची असेल तर २० कवितांची पहिली ओळ एकेका कागदावर लिहा. प्रत्येक कागदावर वेगळ्या कवितेची दुसरी ओळ लिहा. तिसरी ओळ आणखी वेगळ्या कवितेची, चौथी आणखी वेगळ्या कवितेची. अशा प्रकारे प्रत्येक कागदावर चार वेगवेगळ्या कवितांच्या चार ओळी असतील.

मुले गोलात बसतील. सगळ्या कवितांच्या ओळी मिसळल्या आहेत. असे मुलांना सांगा. त्यांच्या कागदावर असलेल्या पहिल्या ओळीला जुळतील अशा पुढच्या तीन ओळी प्रत्येकाने शोधून काढायच्या !

एका मुलाने दुसरी ओळ वाचायची. ज्याच्या पहिल्या ओळीशी ती जुळत असेल त्याने ती लिहून घ्यायची. ज्याच्याकडून ती ओळ मिळाली त्याने त्या ओळीवर काट मारायची. अशा प्रकारे सर्वांना पुढच्या तीनही ओळी मिळेपर्यंत खेळ चालू राहतो.

## ९. प्रतिसाद देणे

चित्रवाचनाच्या प्रतिसादांच्या पातळ्यांबद्दल आधी विवेचन आले आहे. त्याच पातळ्या गोष्टी आणि कवितांच्या संदर्भातही वापरणे औचित्यपूर्ण ठरते.

गोष्टी, मासिके किंवा पुस्तके मुलांना वाटताना सुचवलेल्या क्रमाने प्रश्न काढून ठेवा. वाचून झाल्यावर या प्रश्नांवरून बोलणे करा. मात्र, काही वाचले रे वाचले की प्रश्न असे व्हायला नको. कदाचित आठवड्यातला एखादा वार त्यासाठी ठरवता येईल.

गोष्टी, कविता यावरच्या प्रश्नांना मुले जी उत्तरे देतील ती तपासायची नाहीत. ती 'चूक' आहेत असा शेराही मारायचा नाही. प्रत्येक प्रतिसाद योग्यच असतो, भले त्यामुळे वाचलेल्या आशयाची थोडी मोडतोड होत असली तरी चालेल. मुलांच्या प्रतिसादातून आशय आत्मसात करण्याचा त्यांचा त्यांचा मार्ग दिसतो. वाचलेल्याचा मुलांनी लावलेला अर्थ हा वेगळा, कदाचित अधिक अचूक असा असूही शकतो. तो तसा लावण्याची मोकळीक त्यांना दिली जायला हवी.

◆ ◆ ◆

## प्रकरण ४

# लिहिणे




लिहिणे म्हणजे एक प्रकारचे बोलणेच. आपण जेव्हा लिहितो तेव्हा आपल्या समोर प्रत्यक्ष नसलेल्या अशा कोणाशीतरी आपण संवाद साधत असतो. बऱ्याचदा काहीतरी जपून ठेवण्यासाठी आपण ते लिहितो. कधी ती माहिती असते, कधी एखादी कल्पना तर कधी एखादी आठवण. अर्थात या संदर्भातही लिहिणे म्हणजे स्वतःशीच केलेले बोलणे अशा पद्धतीने लिहिण्याकडे बघता येईल. समजा, माझ्या आजच्या अनुभवांविषयी मी रोजनिशीत लिहून ठेवले तर कधी ना कधी मी स्वतःच ते वाचेन या इच्छेने मी ते अनुभव जपून ठेवत आहे असा त्याचा अर्थ होईल.

लहान मुलांना लिहायला शिकवताना बोलण्याचे एक रूप म्हणूनच आपण शिकवायला हवे. मुले शाळेत यायला लागतात, त्या सुमाराला विविध प्रकारच्या माणसांशी नाना परीच्या विषयांवर बोलण्याची क्षमता मुलांमधे आलेली असते. 'ऐकणारे कुणीतरी असते' ही जाणीव त्यांच्यात रुजू लागलेली असते. लिहायला शिकताना या जाणिवेची खूपच मदत होते. फरक एवढाच, की 'प्रत्यक्षात समोर नसलेल्या श्रोत्यांसाठी' आपण लिहितो हे मुलांना हळूहळू उमगायला हवे. शिक्षकाच्या रूपाने किंवा मुलांच्या रूपाने किंवा स्वतःच्या रूपाने एका प्रकारे प्रत्यक्षात श्रोते असतातही. लिहिणे ही कोणालातरी उद्देशून केलेली कृती आहे ही दृष्टी मुलांना निश्चित मिळेल हे पाहणे शिक्षकाचे कर्तव्य आहे.

सध्या जे घडतेय् त्याहून खूपच वेगळे काहीतरी घडायला हवेय हे स्पष्ट आहे. लाखो मुलांना लिहिणे एखादे यांत्रिक कौशल्य असल्यासारखे शिकवले जातेय. मूल प्रत्येक अक्षर अनेकदा गिरवते आणि शिक्षक मुलांनी काढलेल्या घाऊक अक्षरांचा आकार तपासतात. या पद्धतीने सगळी अक्षरे शिकवेपर्यंत कितीतरी आठवडे जातात. या एवढ्या काळात लिहायला शिकण्यामागची

अर्थपूर्णता मुलांच्या दृष्टीने धुळीला मिळते! नंतर जेव्हा मुलांना शब्द आणि त्यानंतर वाक्ये लिहायची असतात तेव्हा काय लिहायचे हे मुलांना सुचतच नाही. काय लिहायचे हे शिक्षकांनी आपल्याला सांगावे अशी त्यांची अपेक्षा तयार होते.

थोडक्यात सांगायचे, तर लिहायचे ते काहीतरी व्यक्त करण्यासाठी ही जाणीव मुलांमधे निर्माणच होत नाही. शिक्षकाच्या सांगण्यावरून यांत्रिकपणे पुन्हा पुन्हा करण्याची कृती म्हणजे लिहिणे अशीच त्यांची लिहिण्याविषयीची भावना होते.

ही परिस्थिती जर बदलायची असेल, तर लिहिणे हे बोलण्याचेच पुढचे, निराळे रूप असल्याप्रमाणे शिकवले जाईल अशी दक्षता आपण घ्यायला हवी. 'बोलणे' या दुसऱ्या प्रकरणात दिलेल्या सर्व कृती लेखनासाठीही अतिशय उपयोगी अशा आहेत. ऐकणाऱ्यांपर्यंत काही गोष्टी स्पष्टपणे पोचवण्याची संधी बोलण्यातून मिळते. आणि या कारणासाठीच लिहायला शिकवणे महत्त्वाचे ठरते.

**बोलणे आणि लिहिणे यांच्या दरम्यान**

मुलांना लिहायला शिकवायला सुरुवात करताना एक गोष्ट नक्की झाली आहे ना हे आधी पहायला हवे. त्यांचे जीवनानुभव आणि त्यांच्या अवतीभवती घडणाऱ्या गोष्टी यांविषयी मुलांना आत्मविश्वासाने बोलता यायला हवे. म्हणजेच–

१. आपले अनुभव आणि दृष्टिकोन इतरांपर्यंत पोचवण्याची इच्छा त्यांना असायला हवी.

२. त्यांना आपल्या अनुभवाबद्दल बोलता यायला हवे, आपल्या दृष्टिकोनाची मांडणी करता यायला हवी.

या मुलांची लिहायला शिकायची पूर्वतयारी झाली आहे असे म्हणता येईल. तरीही त्यांनी शब्द आणि वाक्ये लिहायला सुरुवात करण्यापूर्वी आणखी बरेच काही करणे आवश्यक ठरते. भाषा कोणतीही असो, लिहायचे म्हटले की त्यात गुंतागुंतीचे आकार कागदावर उमटवणे अंतर्भूत असतेच. त्यासाठी अक्षरांच्या आकाराच्या अचूक संवेदनांची आणि अक्षरांच्या छोट्या आकारांमधले सूक्ष्म फरक लक्षात ठेवण्याची गरज पडते. कल्पना, विचार किंवा भावना व्यक्त करण्यासाठी 'अमूर्त चिन्हे' वापरता येण्याची क्षमताही त्यासाठी आवश्यक असते. अक्षरे ही अमूर्त चिन्हे असतात कारण त्यांचा आकार आणि ती चित्रित करतात ते आवाज यांच्यात अर्थाअर्थी संबंध नसतो. उदाहरणार्थ, 'क' या अक्षराचा आवाज 'क' हाच का याचे कोणतेही तार्किक कारण नाही. ज्या मुलाला मराठी लिहायला शिकायचे आहे, त्याला 'क' हा 'क' म्हणून स्वीकारावा लागतो आणि इतर अक्षरांबरोबर किंवा बाराखडी चिन्हांबरोबर योग्य त्याच ठिकाणी वापरावा लागतो.

इथे उल्लेख केलेल्या क्षमता एका दिवसात विकसित होत नाहीत. मुलांना नेमाने चित्रे काढायला आणि रंगवायला देणे हा त्या क्षमता विकसित करण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

सगळ्या मुलांसाठी कागद आणि रंग विकत घेण्याएवढा खर्च करण्याची ऐपत आहे अशा शाळा अगदी मोजक्या असतील. पण इथे दिलेल्या यादीतले साहित्य वापरून पुष्कळशा शाळा मुलांना चित्र काढायला, रंगवायला देऊ शकतील:

- चारकोलचे तुकडे, खडू, पाटीवरच्या पेन्सिली, गेरु, रांगोळीचे रंग.
- ज्या त्या ठिकाणी उपलब्ध असलेले स्थानिक रंग.
- जुनी वर्तमानपत्रे, पाठकोरे कागद, जुन्या वह्या किंवा आणखी कोणतेही कागद.
- प्लास्टिकच्या डब्या, कप, वाट्या.

यातले बरेचसे साहित्य हळूहळू जमा करता येते, बरीच वर्षे जमवत राहिले की मग शिक्षकाकडे सगळ्या वस्तूंचा चांगला साठा जमतो. या यादीत न दिलेली गोष्ट म्हणजे ब्रश. मुले कोरडे रंगकाम करणार असतील तर ब्रशांची जरूर नाही. ओले रंग मुलांना द्यायचे असतील तर मात्र जाड झुपक्याचे ब्रश कसे मिळवता येतील याचा शिक्षकाला शोध घ्यावा लागेल. अगदी लहान मुलांसाठी कापूस, चिंध्या वापरून ब्रश बनवता येतील. पण ते ठेवून परत परत वापरायला जरा अडचणीचे असतात. विकतचे चांगले ब्रश एकदा घेऊन, दरवेळी वापरून झाल्यावर स्वच्छ धुवून ठेवले तर ते बराच काळ टिकतात.

संवाद साधण्याच्या, काही व्यक्त करण्याच्या इच्छेच्या विकासात 'मुले चित्रात काय काढणार?' हा मुद्दा गाभ्याचा आहे. इथे परत एकदा वर्गातले वास्तव काय आहे हे समजून घेऊन त्यापासून जाणीवपूर्वक दूर जाण्याचा प्रयत्न आपण करायला हवा. बहुतेकशा शाळांमधे जिथे रंगकाम दिले जाते तिथे मुलांना साच्यातल्या विषयांवर चित्र काढायला सांगितले जाते. उदा. 'केळे', 'पतंग', 'फूल व पान' इत्यादि. पतंग किंवा केळे यात काहीच वावगे नाही. मात्र पाच वर्षांच्या मुलांना त्यांनी चित्रात काय काढावे हे शिक्षकांनी सांगावे हेच मुळी वावगे आहे.

आपली जागा अधिकाराची आहे हे शिक्षकाला पक्के ठाऊक असते. शिक्षक मुलाला जे काही करायला सांगेल ते 'आज्ञा' म्हणूनच स्वीकारले जाते. त्यामुळे शिक्षकाने जर 'केळे काढ' असे सांगितले, तर मुलांच्या दृष्टीने ती आज्ञाच असते. या आज्ञेच्या द्वारा मूल काय काय शिकते?-

- मी माझ्या चित्रात काय काढायचे हे शिक्षक ठरवणार.
- मला काय वाटते हे व्यक्त करण्याचे चित्र हे माध्यम नव्हे.
- केळे म्हणून मी जे काढेन त्याला शिक्षकाने केळे म्हणून दाद दिली, तरच ते केळे !

कष्टाने बारीक पेन्सिली वापरून मन लावून शिक्षकाच्या अपेक्षेप्रमाणे पतंग किंवा केळे काढणारी आणि तसे काढायला न जमल्यामुळे हिरमोड होणारी कितीतरी मुले बालवाड्यांमधे आणि प्राथमिक शाळांमधे दिसतात. प्राथमिक शाळांमधे एकवेळ रंगाचे ब्रश नसतील, पण अनेक शाळांमधे 'खोडरबरे' हमखास असतात. आणि अचूकतेपर्यंत पोचण्यासाठीचे साधन म्हणून मुले खोडरबरे वापरतात. मुले केळे काढतात. मग, ते चांगले नाही असे वाटल्याने ते परत काढतात, मग खोडतात, परत खोडतात. शेवटी कागद फाटतो आणि शिक्षक वैतागतात. या भानगडीत त्यांच्या हाताच्या बोटांना भरपूर हालचाल करावी लागते (लेखनाची पूर्वतयारी म्हणून की काय?) पण संवाद साधल्याचे कणमात्रही समाधान त्यांना मिळत नाही. त्यामुळे संपूर्ण कृती वायाच जाते, संवाद साधण्याची अभिव्यक्तीची इच्छा त्यातून नष्ट होते.

मुलांना मुक्तपणे चित्रे काढायला आणि रंगवायला मिळाले तर भाषेचा उपयोजक म्हणून, लिहिणारा म्हणून त्याची घडण होण्यासाठी मुलाला विशेष मदत होतेच, शिवाय त्याच्या एकंदर विकासासाठीही ते पोषक असते. मुलांना चित्रांच्या, रंगाच्या माध्यमात मोकळेपणाने वावरू द्यायला हवे. खूप लहान, म्हणजे तीन-चार वर्षे वयाच्या मुलांबरोबर तुम्ही काम करत असाल, तर मुलांना कागद आणि रंग पुरवले की शिक्षक म्हणून तुमचे पुष्कळसे काम झाले. त्यानंतर मुलांचे रंगवून होईपर्यंत शांतपणे वाट पाहायची. शिक्षकांच्या



सूचनेबरहुकूम करायचे असे आपल्या देशातले एकंदर वातावरण असल्याकारणाने 'मी काय काढू?' आणि 'कसे काढू?' असे बरीच मुले तुम्हाला विचारतील. काय करायचे, कसे करायचे हे शिक्षकांना विचारण्याच्या या सवयीचे रूपांतर, आपल्या कल्पना या माध्यमातून व्यक्त करण्यातली मजा लुटण्याच्या सवयीमध्ये करायचे ही गोष्ट सोपी नाही. शिक्षकाने धीर धरला, मुलांना प्रोत्साहन दिले, तर आणि शिक्षकाला आपले उद्दिष्ट माहीत असेल तर हे रूपांतर होऊ शकते.

मुलांच्या हातांच्या हालचालीच्या विकासासाठी चित्रे आणि रंगकाम हा काही एकमेव मार्ग नव्हे. असा विकास इतरही अनेक कृतींमधून साधता येतो. उदाहरणार्थ - एका भांड्यातून दुसऱ्या भांड्यात पाणी ओतणे, राजमा, हरभरा, चवळी यांसारख्या मिसळलेल्या बिया वेगळ्या करणे, छोट्या-मोठ्या वस्तू उचलणे आणि परत ठेवणे, विविध आकारांच्या वस्तूंच्या आकारांची हाताने चाचपणी करणे, वगैरे. एखाद्याला असे वाटेल की अशा कृती घरोघर मुलांना दिल्या जात असतीलच. दुर्दैवाने हे खरे नव्हे.

गरीब या मध्यमवर्गीय घरांमध्ये मुलांनी वस्तूंना हात लावलेला चालत नाही; मोडेल, तुटेल अशा वस्तूंना तर हात लावलेला अजिबातच चालत नाही. त्यामुळे खरे तर वस्तू हाताळायच्या कशा हे शिकायला ज्याची मुलांना मदत होईल, ते मुलांच्या आवाक्याच्या पलिकडे ठेवले जाते. याचा परिणाम असा होतो, की हातांना जे अनुभव मिळायला हवेत त्या अनुभवांना बहुसंख्य मुले वंचित राहतात. या वंचित राहण्याचा परिणाम लेखनावर अप्रत्यक्ष होत असला, तरी तो गंभीर खासच ठरतो. घरी मुले ज्या अनुभवांना वंचित राहतात, त्या अनुभवांची भरपाई करण्याच्या बाबतीत जे शिक्षक बेफिकीर राहतात, त्यांना मुलांना लिहायला शिकवताना गंभीर अडचणी येतात. अशा अडचणी टाळण्यासाठी रंगवणे, चित्र काढणे ही माध्यमे वापरणे हा एक उत्तम मार्ग आहे.

**लिहायला सुरुवात करणे**

मुलांना लिहायला शिकवण्याची सुरुवात नेमकी कोणत्या वयात करायची हे त्या त्या शिक्षकांनी आपल्या मुलांचा अंदाज घेऊन ठरवायचे. चित्र काढून, रंगवून मुलांनी हातांच्या स्नायूंवर पुरेसा ताबा मिळवला आहे का, ते त्यांना पुरेसे लवचिकपणे हलवता येतात का, हा, सुरुवात कधी करायची हे ठरवण्यासाठी एक चांगला निकष होय. ज्या मुलांची पुस्तकांशी किंवा अन्य वाचनसाहित्याशी गट्टी आहे अशा मुलांना आपणहूनच लिहिण्याची इच्छा होते आणि ती लिहायला मागतात. यामुळे शिक्षकाचे काम सोपे होते. मुले जेव्हा आपणहून ते करायला मागतात तेव्हा ते करण्याची तीव्र इच्छा त्यांच्या मनात असते. कधी कधी ते करणे अवघड पडते आहे असे मुलांच्या लक्षात येते, मग मुले काही वेळाने त्याचा नाद सोडून देतात. पण काही दिवसांनंतर मुले पुन्हा ते करायला मागतात. अशाच प्रकारे मुले अनेक गोष्टींना भिडतात आणि त्यावर प्रभुत्व मिळवतात. लिहिणे काही त्या गोष्टींहून वेगळे नव्हे.

लिहायचे कसे याची सुरुवात करायची हे जेव्हा ठरते, तेव्हा कशाबद्दल लिहायचे हे मुलांना विचारा. ते मुलांनाच तुम्हाला सांगू द्या. मुलांबरोबरच्या संभाषणात 'लिहिणे' या क्रियापदाचा वापर तुम्ही वरचेवर केलेला असेल तर तुम्ही काय म्हणता आहात हे समजून घेण्यात मुलांना बिलकुल अडचण येणार नाही. तुम्हाला काय हवे आहे हे मुलांना नेमके समजले नाही तर तुम्हाला वेगळ्या प्रकारे पुढे जावे लागेल. मग मुलांना तुम्ही विचारू शकाल -

- तुम्हाला कोणते प्राणी आवडतात?
- तुम्हाला खायला काय आवडते?
- हलणाऱ्या, इकडून तिकडे जाणाऱ्या गोष्टी कोणत्या?
- तुम्हाला कशाकशाची भीती वाटते?

(हे जरा विचित्र वाटेलही, पण लक्षात असू द्या, ज्याची भीती वाटते त्याचा प्रचंड भावनिक पगडा मुलांच्या मनावर असतो आणि त्यामुळे ते मुलांना सहज आठवते.)

मुलांना सांगा की तुम्ही प्रत्येकाच्या वहीत किंवा प्रत्येकासमोर जमिनीवर एकेक शब्द लिहिणार आहात. म्हणून प्रत्येक मुलाने दुसऱ्या मुलाहून वेगळा

शब्द सांगायला हवा. हा शब्द मुलांना गिरवायला द्या किंवा पाहून तिथेच खाली पुन्हा लिहायला सांगा. लिहिण्यासाठी जमिनीसारखी दुसरी सुंदर जागा नाही ! तिथे मोठ्या मोठ्या अक्षरात लिहिता येते आणि ते खूपच स्वस्त पडते कारण फक्त खडू किंवा चारकोल विकत आणावा लागतो. एकच गोष्ट आहे, नंतर फरशी स्वच्छ पुसून किंवा धुवून काढावी लागते. फरशी धुण्या-पुसण्यातही मुलांना सहभागी करून घेता येते का पहा. मुलांची लिहायला शिकण्याची उत्सुकता, इच्छा वाढायलाच त्याची मदत होते. मुलांनी फरशी स्वच्छ करण्याला काही पालक विरोधही करतील. पण त्याला कसे सामोरे जायचे, जुमानायचे की नाही हे तुम्हालाच विचारपूर्वक ठरवावे लागेल. अर्थातच, सुरुवात फक्त याच पद्धतीने करता येते असे नाही. मुलांबरोबर काम करणाऱ्यांनी आणखी कितीतरी पद्धतींविषयी ऐकले असेल. सर्वात प्रचलित पद्धत म्हणजे एकेक अक्षर लिहायला शिकविणे. फळा वापरा अगर वह्या-पुस्तके, एक गोष्ट पक्की लक्षात ठेवायला हवी, की सुट्या अक्षरांना काहीच अर्थ नसतो. त्यामुळे फक्त अक्षरे घटवणे आणि त्यावर अतिरिक्त भर देणे याचा परिणाम असा होतो की अर्थपूर्ण संवाद साधण्यासाठी लिहायचे हेच मुलांच्या मनात रुजत नाही. अनेक शब्द आणि अर्थ यांच्यातले दुवे मुलांमध्ये पक्के केल्यानंतर मुळाक्षरे घटवून घेता येतात.

मुळाक्षरे यांत्रिकपणे न शिकवता, शिकवण्यामध्ये ती निराळ्या पद्धतीने गोवून घेण्याचे अनेक मार्ग आहेत. उदाहरणार्थ - शब्दांची मोठी यादी बनवावी. एकाच अक्षराने सुरू होणारे शब्द निवडून मुलांना ते दाखवावे. मुलांचे लक्ष त्याकडे वेधावे. असे अक्षर आणखी कोठे दिसते हे मुलांना शोधायला सांगावे. ही कृती जेव्हा जेव्हा घ्याल, तेव्हा तेव्हा आधीच्या वेळचे शब्द पुन्हा एकदा मुलांना बघायला द्यावे. नेहमीच्या वापरातल्या शब्दांचा साठा मुलांकडे तयार झाला की वेगवेगळ्या निकषांनुसार त्यांचे गट करता येतील. शब्दाची लांबी, शब्दाची जात, शब्दाचा आशय वगैरेवरून एकेका गटातल्या शब्दांची यादी भिंतीवर लावावी. फक्त शिक्षकाला दिसेल एवढ्या उंचीवर ही यादी लावून काही उपयोग नाही. मुलांच्या नजरेच्या पातळीच्या खूपच वर चित्रे आणि तक्ते टांगलेले असतात अशा अनेक शाळा मी बघितलेल्या आहेत म्हणून हा मुद्दा मांडावासा वाटतो. फारच उंचावर साहित्य लावणे मुलांच्या दृष्टीने व्यर्थ आहे, एवढेच नव्हे, तर ते अपमानकारक सुद्धा आहे.

### आरंभाच्या पलीकडे

लेखनाच्या प्राथमिक कौशल्यांवर मुलांनी प्रभुत्व मिळवल्यानंतरच लेखन शिकवण्यातले खरे आव्हान सुरू होते. मुलांमध्ये दोन गोष्टी रुजवणे आव्हानाचे असते : (१) 'श्रोते असतात' याचे भान, (२) व्यक्त करण्याची इच्छा.

प्रत्येक लहानसहान कृती आखताना दूरदृष्टी ठेवली तरच शिक्षक हे आव्हान पेलू शकेल. श्रोते असण्याचे भान आणि काहीतरी व्यक्त करण्याची इच्छा या गोष्टी लिहिण्याशी तसेच बोलण्याशीही निगडित आहेत. त्यामुळे बोलण्याच्या संधींचा लिहिण्यासाठी आणि लिहिण्याच्या संधींचा बोलण्यासाठी उपयोग होत असतो.

'श्रोते असतात' याचे भान असले म्हणजे लिहिताना एक निश्चित व्यक्ती आपल्या मनात असते. व्यक्त करण्याची इच्छा असली म्हणजे लिहिण्याला नेमका हेतू मिळतो. शब्द, वाक्ये, गोष्टी – मुले जे लिहितात ते शिक्षकाने वाचावे यापुरतेच असते. वर्गातील लेखनाच्या संदर्भात मुलांचे 'श्रोते असतात' याचे भान वाढावे म्हणून, कोणाला उद्देशून लिहायचे यासाठी विविध पर्याय शिक्षक सुचवू शकतो : शेजारी बसलेले मित्र-मैत्रीण, वर्गातलेच आणखी कोणीतरी, दुसऱ्या वर्गातली मुले, पालक वगैरे. मधल्या सुट्टीत वर्गात येणारा कुत्रा, बस, शेजारच्या खेड्यातली मुले अशा काल्पनिक कोणालातरी उद्देशून लिहायलाही मुलांना मजा येईल. मुले जसजशी मोठी होत जातील तसतसे समाजात विविध भूमिका बजावणाऱ्या व्यक्तींना उद्देशून लिहिणे मुलांच्या कक्षेत निश्चितच येऊ लागेल. कोणाला उद्देशून आपण लिहितो यानुसार भाषेचा वापर बदलायचा यासाठी शिक्षकाने मुलाला प्रोत्साहन द्यायला हवे. उदाहरणार्थ, कुत्रा आपल्याला का आवडतो हे कुत्र्याला सांगायचे असेल तर कुत्र्याला

समजेल, आवडेल अशा भाषेत ते मांडणे महत्त्वाचे असते. आपण कुत्र्याला म्हणू ते आणि आपण मित्राला म्हणू ते, आशय आणि शैलीच्या दृष्टीने वेगळे असणार. आपण कुत्र्याला म्हणू, ''शहाणा माझा कुत्रा. बैस खाली.'' मित्राला म्हणू, ''तू माझ्याशी खेळतोस ना, म्हणून तू मला आवडतोस.'' आपण कोणाला उद्देशून लिहितो किंवा बोलतो यावर आपण कोणते शब्द, वाक्प्रचार किंवा वाक्यरचना निवडणार हे अवलंबून असते. मात्र शब्द आणि रचना वेगवेगळे, सुटेसुटे शिकवू नयेत. ज्यांना उद्देशून मुले लिहिणार त्यांच्यात जसजसे वैविध्य येत जाईल तसतशी मुले शब्दांची, रचनांची योग्य निवड आणि वापर करायला शिकतील.

काहीतरी सांगावेसे वाटणे मुलाच्या व्यक्तिमत्वातील अनेक घटकांवर अवलंबून असते. स्वतःच्या दृष्टिकोनांबाबतचा विश्वास हा त्यापैकी सर्वात महत्त्वाचा घटक. आपल्याला काय काय दिसले याबद्दल जे मूल कधीही बोललेले नाही किंवा ते मूल एखाद्या प्रसंगाचे वर्णन करीत असताना त्याच्या उणिवांवरच बोट ठेवले गेले आहे, त्याच्याकडे दुर्लक्षच केले गेले आहे, अशा मुलाला बोलते करण्याचा प्रयत्न केला तर त्या मुलाचा प्रतिसाद 'मला काही सांगायचं नाही' असा असतो. मूल कदाचित या शब्दात ते सांगणार नाही. पण ते शिक्षकालाच विचारील, ''काय बोलू?'' किंवा ''काय लिहू?'' यातून, त्याला आपणहून काही सांगायचे नाही हे आपल्या लक्षात येईल. तुम्ही जर अशा मुलांसोबत काम करीत असाल तर तुमच्यापुढचे आव्हान मोठे आहे. आपला जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन योग्य आहे याविषयीचा आत्मविश्वास तुम्हाला त्यांच्यात निर्माण करायला हवा.

### शिक्षकाचा प्रतिसाद

मुले आपापले लिहू लागली, की पुष्कळशी प्रगती शिक्षकाच्या प्रतिसादावर अवलंबून असते. आपल्याकडच्या बहुसंख्य प्राथमिक शाळांमध्ये, व्याकरण किंवा शुद्धलेखनाच्या चुकांवर मारलेल्या काटा, एवढाच शिक्षकांचा मुलांच्या लेखनाला प्रतिसाद असतो. लाल शाईतल्या अशा खुणांनी मुलांच्या वह्या भरलेल्या असतात. आणि जेव्हा मुलाने लिहिलेले सगळे बरोबर असेल तेव्हा मात्र शिक्षक 'बरोबर'ची एक खूण करून सही करतो. असे प्रतिसाद फार फार अपुरे ठरतात. चुकांवरच्या फुल्या आणि बरोबरच्या खुणा यांच्या जोडीला शिक्षकाने मुलांच्या लेखनाला दाद म्हणून चार शब्द लिहायला हवेत. मुलाचे लेखन वाचून तुम्हाला कशाची आठवण आली का? लेखन नेमके कशामुळे चांगले वाटले? या विषयावर आणखी काय म्हणता येईल? याच विषयावर कोणी वेगळे काही लिहिले आहे का? मुलांच्या लिखाणाला प्रतिसाद देण्याचे असे अगणित मार्ग आहेत.

आपल्या नेमक्या प्रतिसादाने शिक्षक मुलाचे बोलणे जसे वाढवू शकतो, तसेच मुलाचे लेखन वाढावे म्हणूनही शिक्षकाने प्रयत्न करायला हवेत. लेखन ही यांत्रिकपणे करण्याची गोष्ट नसून एक प्रकारचा संवाद आहे, हे, अशी एकदोन वाक्ये मुलाच्या वहीत प्रतिसादादाखल लिहिण्यातून मुलाला दाखवून देता येते. व्याकरणाचा सराव तपासण्याचे काम शिक्षक म्हणून आपल्याला करावेच लागते. ते करतानाही अगदी थोडक्यात, त्या त्या मुलाला उद्देशून, वाचावेसे वाटेल असे काही ना काही शेवटी लिहिता येते. तुमच्या सहीपेक्षा ते चार शब्द मुलासाठी मोलाचे ठरतात.

फक्त चुका दाखवून देणे हे चुका दुरुस्त होण्यासाठी पुरेसे नसते. लाल शाईने चुकांवर गोल करणे किंवा त्याखाली खुणा करणे यातून आपण फक्त मुलांचा तोकडेपणा दाखवून देत असतो. मुलाला काय काय जमायला लागले आहे, ते कोठे कसे उमटले आहे हे दाखवणे खरे तर महत्त्वाचे. जेथे चुकले असेल तेथे योग्य पर्याय देणे महत्त्वाचे. चुकांच्या बाबतीत आणखी एक गोष्ट करता येते - मुलानेच चूक हेरावी यासाठी त्याला प्रवृत्त करणे. उदाहरणार्थ - एक शब्द चुकीच्या पद्धतीने दोन-तीनदा आणि अचूक पद्धतीने एकदा लिहून मुलाला शोधायला सांगावे. चूक हेरण्यामध्येच मुलाचा सहभाग घेतल्याने आपल्या कामाकडे पाहण्याची परीक्षणात्मक दृष्टी मुलामध्ये येण्यासाठी मदत होते.

## काही भाषिक खेळ

### १. परिचित वस्तू

शब्दसमूहाचे खेळ खेळताना वेगवेगळ्या परिचित विषयांशी संबंधित शब्द आठवून मुलांनी सांगावेत. उदाहरणार्थ, स्वयंपाकघरातील भांडी, कपडे किंवा वाहने. त्यातही शब्दांचे उपगट करावेत : चमच्यांचे प्रकार, भांड्यांचे प्रकार वगैरे. ही यादी फळ्यावर लिहावी. यादीतला आवडेल तो कोणताही एकेक शब्द पहिल्या गटातील मुले आपापल्या वहीवर/पाटीवर लिहितील. आता दुसऱ्या गटातील मुले त्या यादीतील एखादा शब्द कसा लिहायचा हे विचारतील. पहिल्या गटातील मुलांनी आळीपाळीने आपण उतरवलेला शब्द लिहून दाखवायचा.

### २. संग्रह

तुम्ही जेथे काम करता तेथील आसपासच्या भागातून मुलांनी दिसतील त्या खुणा, घोषणा गोळा करून आणायच्या. खेड्यातही भिंतीवरची घोषवाक्ये, भित्तीपत्रकांवरील मजकूर, जाहिराती यामधील मजकूर मुले आणू शकतील. शाळेत येताना मुलांना त्यावर लिहिलेले जे जे दिसले, ते लिहून आणायला सांगावे. मुलांनी आणलेला मजकूर फळ्यावर लिहावा. ज्या त्या मुलाने आपण तो शब्द अथवा ते वाक्य कोठे वाचले हे सांगावे.

### ३. शब्द पूर्ण करणे

मुलांच्या जोड्या करा. एका मुलाने शब्द सुरू करायचा. जोडीतल्या दुसऱ्याने तो पूर्ण करायचा. आळीपाळीने दोघांनी किमान दहा-दहा शब्द पूर्ण करायचे.

### ४. एकच शब्द

पाचापाचाचे गट करा. प्रत्येक गटाला लिहिण्यासाठी कागद, वही किंवा पाटी आणि पेन्सिल/पेन द्या. प्रत्येक गटात सुरुवात करण्यासाठी एका मुलाची निवड करा. सुरुवात करणाऱ्याने वाक्यातील पहिला शब्द कागदावर लिहायचा आणि कागद पुढच्या मुलाकडे द्यायचा. पुढच्या मुलाने त्याच वाक्यात बसेल असा आणखी एक शब्द लिहायचा आणि कागद पुढे द्यायचा. वाक्य पूर्ण होईपर्यंत कागद पुढे पुढे जात राहील. वाक्य पूर्ण झाले की दुसऱ्या मुलाने एक शब्द लिहून नवीन वाक्य सुरू करायचे.

### ५. नकाशा काढणे

आपण घरी कसे जातो हे मुलांनी वर्गाला सांगायचे. त्याआधी शिक्षकाने आपण घरी कसे जातो, वाटेत काय लागते हे दोन-चार जागांचा उल्लेख करून सांगावे. सगळ्यांचे सांगून झाले की त्यांनी सांगितलेल्या रस्त्याचा नकाशा त्यांना काढायला सांगावा. नकाशा कसा काढायचा हे समजण्यासाठी आपल्या घरी जाण्याचा नकाशा शिक्षकाने फळ्यावर काढून दाखवावा. मुले नकाशा काढत असताना प्रत्येक मुलाजवळ जावे. नकाशात त्याने जे दाखवले असेल त्यापैकी कशाचेतरी नाव मुलाला नकाशाच्या खाली लिहून द्यावे. उदाहरणार्थ, झाड, दुकान, पत्राची पेटी इत्यादी. लिहून दिलेला शब्द पाहून त्याखाली तसाच लिही असे मुलाला सांगावे.

नंतरच्या खेपेला दुसऱ्या एखाद्या ठिकाणी जाण्याच्या वाटेचा नकाशा काढायला सांगावा. उदाहरणार्थ, 'माझ्या मित्राच्या घरी जायची वाट', 'मंडईची वाट', 'देवळाकडे असे जायचे' इ. प्रत्येकवेळी नकाशाखाली शब्द लिहून द्या आणि त्या शब्दांची संख्या हळूहळू वाढवत न्या.

### ६. अवतीभवतीच्या जागा

आधीच्या खेळाचाच हा पुढचा भाग. यावेळी फक्त वाटेचा नकाशा न काढता त्या त्या जागेचा नकाशा मुलांनी काढायचा. उदाहरणार्थ, शाळेच्या मागचे आवार, वर्ग, जवळचे तळे किंवा नदी. या नकाशात दाखवलेल्या गोष्टीपैकी एखाद्या गोष्टीचे नाव मुलांना तेथे लिहायला सांगा.

### ७. तिथे कसे जायचे?

घरच्या, शेजारपाजारच्या मोठ्या माणसांशी बोलून जवळपासची गावे, शहरे यांची नावे विचारून यायला सांगा. ती फळ्यावर लिहा. मुलांना उतरवून

घ्यायला सांगा. जी गावे ज्या दिशेला आहेत, त्या दिशांना त्यांची नावे लिहून साधा आराखडा बनवा. गावांची नावे लिहिलेल्या चिठ्ठ्या मुलांना वाटा. नकाशानुसार त्यांना उभे करा. गावांच्या दिशेनुसार मुलांना बोलते करा. उदाहरणार्थ,

''कुठे चाललास?''

''नाशिकला.''

''नाशिक कुठे आहे?''

''उत्तरेला''

दिशा, अंतर याविषयीचे शब्द मुलांना लिहून दाखवा.

**८. चित्रांविषयी लिहिणे**

'बोलणे' या प्रकरणातील कृती क्र. ८ पहा. त्यानुसार थोड्या मोठ्या मुलांबरोबर ही कृती घेऊन त्यांना तुमच्या प्रश्नांची उत्तरे लिहायला सांगा.

मुलांची स्वतःची चित्रे, जाहिराती, मासिकातील चित्रे अशी कोणतीही चित्रे वापरता येतील. चित्राच्या वर्णनाने सुरुवात करून हळूहळू लेखनाची काठिण्यपातळी वाढवत न्यावी.

**९. आवाज ऐकणे**


ज्यांना लिहिता येते अशी चार-पाच मुले या खेळासाठी लागतील. ती 'रेकॉर्डर' म्हणून काम करतील. पाच-पाच मुलांचे गट करा. जेवढे वेगवेगळे आवाज त्यांना ऐकायला येतील त्यांची यादी त्यांनी करायची. गटागटांनी इकडे-तिकडे थोडेसे हिंडायलाही हरकत नाही. फाटकापाशी, मागच्या बाजूला... वगैरे. कोणाला नवीन आवाज ऐकू आला की त्याने 'रेकॉर्डर'ला सांगायचे, 'रेकॉर्डर'ने तो आवाज यादीत लिहून ठेवायचा. उदाहरणार्थ, पानांची सळसळ, दारांची करकर इ.

गट पुन्हा एकत्र आले, की रेकॉर्डर झालेल्याने यादीतले आवाज वाचून दाखवायचे. आपण सांगितलेला आवाज प्रत्येकाने पाहून लिहायचा.

**१०. कविता करणे :**


पाचापाचाचे गट करा. प्रत्येक गटाला कवितेच्या चार ओळी द्या. प्रत्येक गटाला पंधरा वीस मिनिटे आपापसात बोलू द्या. प्रत्येक गटाने पुढच्या चार ओळी जुळवायच्या.

• • •



## प्रकरण ५

# पाठ्यपुस्तके, परीक्षा आणि अवकाश



हे अखेरचे प्रकरण प्राथमिक शाळांमधल्या वास्तवाविषयी आहे. येथे आपण ज्या प्रश्नाचा ऊहापोह करणार आहोत तो म्हणजे, 'एखाद्या सर्वसाधारण शाळेमधल्या दैनंदिन चक्रातल्या अपेक्षा पूर्ण करायच्या असताना या पुस्तकात सुचविलेल्या गोष्टी करणे शक्य आहे का?'

हे पुस्तक वाचणाऱ्या अनेक शिक्षकांच्या मनात हा प्रश्न रुंजी घालत असेल. हे पुस्तक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी वापरणाऱ्यांच्या दृष्टीनेही हा प्रश्न महत्त्वाचा आहे. शाळेतल्या वास्तवाचे भान शिक्षकाहून अधिक चांगले कोणाला असणार? त्यामुळेच शाळेतल्या वास्तवाबाबतची जाणीव ठेवून हे पुस्तक लिहिले आहे असे शिक्षकाला वाटले नाही, तर हे सर्व लेखन व्यर्थच म्हणावे लागेल.

### लावलेली क्रमिक पुस्तके

आपल्या देशातल्या झाडून सर्व शिक्षकांना पाठ्यपुस्तक शिकवून संपवावे लागते. शिक्षकाला पाठ्यपुस्तकातला एकेक धडा करीत सर्व धडे शिकवावे लागतात, त्या त्या धड्यावर आधारित गृहपाठ द्यावा लागतो, त्याखालचे स्वाध्याय सोडवून घ्यावे लागतात आणि धड्याच्या आशयावर मुलांनी प्रभुत्व मिळवले ना याकडे लक्ष पुरवावे लागते. भाषाशिक्षणापुरते बोलायचे तर या सगळ्याच अपेक्षा विपरीत ठरतात! नेमलेल्या क्रमिक पुस्तकातील धड्यांचा बौद्धिक लगदा करायचा आणि तो रोज थोडा थोडा मुलांना बळेच गिळायला लावायचा हे काम करताना मजा येणे दुरापास्तच! मात्र शिक्षक म्हणून आपल्याला हेच करावे लागते.

अशा परिस्थितीत आपण एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी, की जगातले कोणतेही पाठ्यपुस्तक घेतले तरी मुलांचे शाळेतले जीवन आनंदाचे आणि अर्थपूर्ण बनवायला जे आवश्यक असते, ते सगळे काही त्या पुस्तकातच

असणे शक्यच नाही. उत्तम पाठ्यपुस्तकातही चांगल्या आशयाचे काही नमुने असतात, बाकीची भिस्त शिक्षकांच्या कल्पकतेवर आणि कष्टांवरच असते. मुळात हे जर आपण स्वीकारले तर या पुस्तकात दिलेला सल्ला आणि सुचविलेल्या गोष्टी कितपत ग्राह्य आणि टिकाऊ आहेत याबाबत आपण विचार करू शकू. जो पायाभूत मुद्दा या पुस्तकात उचलून धरावयाचा होता तो आपण पुन्हा एकवार आठवून बघू : 'भाषेच्या तासाला आपण काय शिकवितो?'

या प्रश्नाचे उत्तर या पुस्तकात मिळते ते असे, की मुलांच्या मनाच्या विकासाशी संबंधित असे तऱ्हेतऱ्हेचे अनुभव भाषेच्या कक्षेत येतात. मुलांबरोबर कमालीच्या लवचिक, सर्जनशील आणि मौजेच्या माध्यमात काम करण्याची संधी भाषेच्या तासाला आपल्याला मिळत असते. मुले जेव्हा शाळेला येतात तेव्हा या माध्यमाशी परिचित असतात, ही या माध्यमाची खासियत. वेगवेगळ्या प्रसंगी गरजांनुसार वळवत - वाकवत वेगवेगळ्या परिस्थितीत मुले, हे माध्यम वापरतच असतात. भाषेचा शिक्षक मुलांना अगदी नवीन असे काही देत नसतो, तर आधीपासूनच जे माध्यम मुले हाताळत आहेत त्यावर अधिक प्रभुत्व मिळवण्यासाठी मदत करणार असतो. शिकणे, प्रतिसाद देणे यासारखी किंवा वाचन-लेखनासारखी नवीन कौशल्ये विकसित करण्यासाठी विविध प्रसंग निर्माण करून शिक्षक अशी मदत करू शकतो.

कोणतेही पुस्तक हे फक्त एक साधन असते आणि पाठ्यपुस्तकेही याला अपवाद नाहीत. पाठ्यपुस्तक जर दर्जेदार असेल तर कदाचित इतर पुस्तकांपेक्षा जास्त वरचेवर आपण ते वापरू. त्यातले स्वाध्याय जर या पुस्तकात नमूद केलेल्या उद्दिष्टांना धरून असतील तर वर्गातील गप्पा, लेखन यांचा पाया म्हणून त्या स्वाध्यायांचा उपयोग करून घेता येईल. मात्र शिक्षकाला हे अगदी स्पष्ट हवे की भाषा वापरण्याची मुलांची क्षमता फुलवणे हे आपले खरे उद्दिष्ट, पाठ्यपुस्तकातील धडे उरकणे हे नव्हे.

वर्गातल्या जीवनावर पाठ्यपुस्तकांचाच पगडा असेल, शिक्षक पाठ्यपुस्तकांखेरीज काहीच वापरत नसेल तर ती चिंतेची बाब आहे.

या पुस्तकात सुचवलेल्या गोष्टी, या पुस्तकातील दृष्टिकोन पाठ्यपुस्तकाच्या हातात हात घालू शकतील असे आहेत. येथे सुचवलेल्या गोष्टी पाठ्यपुस्तकावर बेतून सहज घेता येतील. मुलांना जर विविध प्रकारच्या सर्जनशील कृतींच्या द्वारा भाषा शिकण्याची संधी मिळत गेली, तर पाठ्यपुस्तक समजून घेण्यात त्यांना येणाऱ्या अडचणींचे प्रमाण झपाट्याने कमी होईल. भाषेची फक्त पाठ्यपुस्तकेच वापरणाऱ्या मुलांपेक्षा, विविध शैक्षणिक अनुभवातून भाषा शिकणारी मुले पाठ्यपुस्तकावर लवकर प्रभुत्व मिळवतील.

या पुस्तकात सुचवलेल्या कितीतरी कृतींसाठी पाठ्यपुस्तकातला छापील मजकूर, चित्रे वापरता येतील. बोलण्यासाठी पाठ्यपुस्तकावर आधारित विषय निवडता येतील. पाठ्यपुस्तक इतर साहित्यस्रोतांबरोबर वापरणे अधिक सयुक्तिक ठरते, कारण सर्व कृतींसाठी 'पाठ्यपुस्तक एके पाठ्यपुस्तक' असे झाले तर नवीन काहीतरी हाताळण्यातून येणारी मजा मुलांना मिळेनाशी होते. विविध स्रोत वापरून आखलेल्या व्यापक वेळापत्रकाचा एक भाग म्हणून, पाठ्यपुस्तकावर आधारित कृतींना योग्य ते स्थान कसे देता येईल याचा विचार शिक्षकाने करायला हवा. यासाठी एका गोष्टीची आवश्यकता आहे, ती म्हणजे आत्मविश्वास - पाठ्यपुस्तकाचा लगदा करून तो रोज मुलांना भरवत न राहताही, पाठ्यपुस्तक शिकवून पूर्ण करता येते, हा आत्मविश्वास.

**जागेचा प्रश्न**

भारतातल्या जवळजवळ सगळ्या शाळांना जागेचा प्रश्न भेडसावतो. जागेच्या प्रश्नाकडे दोन अंगांनी पाहता येते. पहिले सर्वपरिचित आहे, पण दुसऱ्याकडे अभावानेच लक्ष दिले जाते. पहिले, म्हणजे वर्गातल्या मुलांची संख्या आणि दुसरे म्हणजे जागेचे व्यवस्थापन.

नावनोंदणी झालेली सर्व मुले खरोखरच शाळेत आली तर शाळेत त्यांच्या दाटीवाटीमुळे अवघड परिस्थिती निर्माण होईल असे म्हणायला पुरेसा आधार आहे. या पुस्तकात सुचविलेल्या पद्धतीने काही करायचे म्हटले, तर पन्नास-साठ मुलांच्या वर्गात एकट्या शिक्षकाला ते जमणे बिलकुल शक्य नाही. तसेच एकशिक्षकी शाळांमध्ये निराळ्या कारणांमुळे या पुस्तकानुसार कृती करून घेणे कठीण वाटेल. परंतु अशा शिक्षकांनी आठवड्यातून निदान एकदा-दोनदा तरी अशा कृती मुलांना देण्याचा प्रयत्न करायला हवा. तेवढेही पुरेसे आहे.

जागेच्या प्रश्नाचे दुसरे अंग सर्वच शिक्षकांच्या बाबतीत खरे आहे, मग ते तीस-चाळीस विद्यार्थी असलेले शिक्षक असोत अगर फार जास्त विद्यार्थी असलेले शिक्षक असोत. भाषाविकासासाठी पोषक ठरेल अशा रीतीने शाळेत उपलब्ध असलेल्या जागेच्या वापराचे नियोजन करणे हे एक आव्हानच असते. असे पोषक वातावरण आपल्याकडच्या शाळांमध्ये नसते याविषयी बहुधा कोणाचे दुमत असणार नाही. भिंती मोकळ्याच असतात, बऱ्याचदा अस्वच्छ असतात; मांडणी, कपाट यापैकी काहीच नसते, असलेच तर त्याचा उपयोग विशिष्ट हेतूने होताना दिसत नाही. भिंतीच नसलेल्या शाळा किंवा कोसळायला आलेल्या भिंतींच्या शाळा आपण इथे विचारातच घेतलेल्या नाहीत.

जेथे भिंती भक्कम उभ्या आहेत, तेथे या पुस्तकाशी मिळत्याजुळत्या अशा विविध हेतूंनी भिंतींचा वापर करणे शक्य आहे. मुलांनी विविध माध्यमांतून, चित्रांतून स्वतःला व्यक्त करण्यावर आपण पुष्कळ भर दिला आहे. शिक्षकाने जमविलेली किंवा मुलांनी काढलेली चित्रे लावण्यासाठी 'भिंती' ही उत्तम जागा आहे. दोन्ही प्रकारच्या चित्रांचा उपयोग बोलण्याच्या किंवा लेखनाच्या कृतींसाठी करता येतो. चित्रे भिंतीवर फार उंचावर टांगणे बरोबर नाही. भिंतीवर लावलेल्या चित्रांची काळजी घ्यायलाही मुलांना हळूहळू शिकवावे लागेल. शिक्षक म्हणून तुम्ही जर रिकाम्या भिंतींच्या वर्गाचे सचित्र भिंतींच्या वर्गात रूपांतर करणार असाल तर एका दिवसात, आठवड्याभरात, फार काय महिन्याभरातही मुले चित्रांची काळजी घ्यायला शिकतीलच असे नाही. त्यात यश येण्यासाठी थोडी वाट बघावी लागेल. लिहायला सुरुवात करताना शाई शिंपडायची जागा म्हणून जी मुले भिंतींचा वापर करीत आली, ज्यांना उजाड भिंती बघण्याची सवय होती, त्यांना भिंतीवरची चित्रे, त्यांची काळजी घेणे याची सवय होण्यासाठी सवड लागणारच. पण ती सवय हळूहळू लागू शकते हे निश्चित.

बऱ्याच शाळांमध्ये बोधवाक्ये रंगविण्यासाठी भिंतींचा वापर हमखास केला जातो. ना भाषिक, ना नैतिक - कोणताच आशय त्या बोधवाक्यांना नसतो. ती वाक्ये केवळ पोकळ असतात. मात्र अशी वाक्ये भिंतींवर रंगवण्याची परंपरा कायम आहे. हे पुस्तक वाचून त्यात सुचविलेले प्रयोग करून पाहणाऱ्या शिक्षकांच्या लवकरच लक्षात येईल, की अशी बोधवाक्ये भाषेच्या दृष्टीने कमालीची साच्यातली असतात. बोधवाक्यात सांगितल्याबरहुकूम जगताना मुलांना कोणीच दिसत नाही, त्यामुळे बोधवाक्ये म्हणजे भाषेचा निरर्थक उपयोग हे मुलांना समजून चुकते.

वर्गखोली चहूबाजूंनी अशा बोधवाक्यांनी सजविली असेल तर भाषा आणि अर्थ यांची सांगड मुलांच्या मनात बसणे का अवघड जात असेल हे आपल्याला सहज समजेल. आणि ती सांगड बसणे हेच तर आपले खरे उद्दिष्ट.

बोधवाक्यांच्या जागी कवितांची भित्तिपत्रके लावता येतील. त्यावर मोठ्या अक्षरात लिहिलेली कविता आणि सोबत चित्रेही असू शकतील. शाळेतली मोठी मुले कविता लिहितील, छोटी मुले चित्रे काढतील. 'बोधपर' कविता न निवडता, वाचायला गंमत वाटेल अशा मजेशीर कविता निवडायला हव्यात. मुलांना आवडणाऱ्या, त्यांना भिंतीवर लावाव्याशा वाटणाऱ्या कविता निवडा.

अशी भित्तिपत्रके कायम बनवीत राहायला हवे. ती बदलली जायला हवीत.

**आणि परीक्षा !**

हे पुस्तक ज्यांना वापरायचे आहे, त्या शिक्षकांना परीक्षेचा विचार करावाच लागणार. परीक्षेत काय घ्यायचे यावर रोज काय घ्यायचे हे अवलंबून राहते आणि ते खूपच आधीपासून सुरू होते. कितीतरी खाजगी शाळांमध्ये बालवाडी आणि पहिलीतला प्रवेश चाचणीवर अवलंबून असतो. नंतर दर वर्षी मुलाला वार्षिक परीक्षेचे दिव्य पार पाडावे लागते. काही भागातच मुले परीक्षेशिवाय पुढे जाण्याची व्यवस्था आहे. पाचवीची परीक्षा देशात बऱ्याच भागांमध्ये महत्त्वाची मानली जाते. पाचवीनंतर तर कितीतरी परीक्षा असतात, आणि त्यांची पालकांना, शिक्षकांना आणि मुलांना भीती वाटत असते. दिवाळीसारखे सण हा जितका आपल्या संस्कृतीचा अंगभूत भाग आहे, तितकीच परीक्षांची भीती हीसुद्धा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. परीक्षेची भीतीच नसलेले भारतीय मूल कल्पनेतही आणणे कठीण जाते!

सर्वव्यापी परीक्षाव्यवस्थेच्या प्रभावापासून मुलांना वाचवणे प्राथमिक शिक्षकांनाही जमत नाही. पण पारंपरिक शिक्षणपद्धतीत थोडे बदल करण्याचा प्रयत्न शिक्षक करू शकतील. यात वार्षिक परीक्षाही आल्या आणि वरचेवर घेतल्या जाणाऱ्या, विशेष करून इंग्रजी शाळांमध्ये प्रचलित असलेल्या खंडीभर चाचण्याही आल्या. भाषेपुरते बोलायचे, तर भाषेचे क्रमिक पुस्तक हे जणू काही ज्ञानकोश असल्याप्रमाणे त्यातील आशयावरच या चाचण्यांमध्ये लक्ष केंद्रित केलेले असते. वास्तविक, विज्ञान किंवा समाजशास्त्रे यांच्या पुस्तकांपेक्षा भाषेची पुस्तके मूलतःच निराळी असतात. त्यात काही वेचे असतात आणि या वेच्यांच्या अभ्यासातून मुलांनी कुशल, स्वावलंबी वाचक बनावे; पुढे अपरिचित मजकूर वाचावा, समजून घ्यावा अशी अपेक्षा असते. मुलांच्या वाचनकौशल्यांची पातळी तपासायची तर त्यांची स्वतंत्र वाचनातली गोडी आणि क्षमता तपासल्या गेल्या पाहिजेत. पाठ्यपुस्तकावर आधारित असलेल्या प्रचलित परीक्षापद्धतीत, नेमके जे तपासले जायला हवे, त्याकडे दुर्लक्षच होते.

सध्याच्या परीक्षापद्धतीत मुलांच्या श्रवणक्षमतेकडे आणि संभाषणक्षमतेकडेही पूर्ण दुर्लक्ष होते. मत मांडणे, वर्णन करून सांगणे यासारख्या क्षमतांना परीक्षेत जागा नसते. एकेकाळी तोंडी परीक्षा हा शालेय अभ्यासक्रमातील एक मूलभूत भाग असे. त्याचे पुनरुज्जीवन व्हायला हवे, विस्तार व्हायला हवा. श्रवण आणि संभाषण यांच्याशी संबंधित कौशल्यांचा त्याद्वारे परीक्षेत अंतर्भाव व्हायला हवा. या कौशल्यांबाबत मुलांची प्रगती कशी होते आहे याचे निरीक्षण करणे, त्याच्या नोंदी ठेवणे याबाबत शिक्षकांचे प्रशिक्षण व्हायला हवे. मुलांच्या नोंदींसाठी आजकाल अनेक निकषांच्या याद्यांचा वापर केला जातो. मात्र बऱ्याचदा त्यांचा वापर फार वरवरचा, अधिकारी आणि पालक यांना खूश ठेवण्यापुरता असतो. शिक्षकाकडे पन्नासहून अधिक मुले असतील, तेव्हा, किंवा एकाहून अधिक वर्ग असतील तेव्हा नोंदींचे मूल्यमापनात्मक रूप राखणे हे आव्हानाचे ठरते. अशा परिस्थितीत वापरण्यासारख्या कमी क्लिष्ट अशा नोंदींच्या पद्धतींची उत्तम रचना असलेल्या, कल्पक अशा परीक्षापद्धतींची आज गरज आहे.

सरतेशेवटी एक नक्की म्हणता येईल, की पारंपरिक परीक्षापद्धतीतून मुलांची, फक्त पाठांतरावर आधारित उत्तरे लिहिण्याची क्षमता तपासण्याचे फार संकुचित काम साध्य होते. शाळांच्या चाचण्या अन् परीक्षांच्या व्यवस्थेत, विविध प्रकारच्या श्रोत्यांना उद्देशून लिहिणे, अभिव्यक्तीप्रधान लेखन करणे, वृत्तांत लिहिणे अशा विविध प्रकारांना जागाच मिळत नाही. अशा प्रकारचे लेखन करण्यामागच्या उद्देशांविषयी व्यवस्थेत किती तिटकारा आहे हे त्यांना मिळणाऱ्या किरकोळ जागेवरूनच लक्षात येते. या सर्व प्रकारांना परीक्षेत पुरेसे स्थान द्यायचे झाले, तर ठराविक तासिकांमध्ये बांधलेले मुलाचे प्रतिसाद तपासण्याच्या पलिकडे आपल्याला जावेच लागेल. शिक्षकाचा एकंदर कार्यभार विचारात घेऊन नोंदी करण्याच्या योग्य पद्धतींचा शोध आपल्याला घ्यावा लागेल, हे निश्चित.

◆ ◆ ◆